कुटुंब, मित्र आणि निसर्गासोबत एक अविस्मरणीय दिवस!
ह्या सुट्टीचा महाआनंद आणि धमाल्या धमाल....
आमरस पार्टी वनभोजन
रेन डान्स / बोटींग / पपेट शो
बर्डपार्क / झीप लाईन
ॲडव्हेंचर्स / वॉटर स्पोर्ट्स
डॉ. कांकरियांचे साईबन
9112288622
9850500905 / 9096639368
डॉ. कांकरियांचे साईबन कृषी पर्यटन केंद्र, एम.आय.डी.सी.मागे, अहिल्यानगर

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

नगरकरांसाठी समर प्लॅन
फक्त ₹550* मध्ये
FRIENDS & FAMILY साठी PERFECT प्लॅन
PACKAGE INCLUDES
Adventure Games / Swimming Pool
Rain Dance / Turf & Fun Activities
आवश्यक सूचना -
१) पूर्व बुकिंग आवश्यक
२) स्विमिंग कॉस्च्यूम आवश्यक
३) मॅनेजमेंटचे सर्व निर्णय अंतिम असतील
रोज पिकअप व ड्रॉप सुविधा
ठिकाण : आनंदधाम येथून
बुकिंगसाठी संपर्क: 6262-90-6262 व्हिंटेज हिल्स, दौंड रोड, अहिल्यानगर.

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रुपये | अहिल्यानगर, शुक्रवार दि. ०८.०५.२०२६ | अंक नं. ०३२ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

स्वप्नवत ऑफर... स्वप्नवत सफर...
१०१ भाग्यवंत जोडप्यांना चक्क FREE हनिमून टूर
१ डिसेंबर 2025 ते 31 मे 2026
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

22 कॅरेट सोन्याचा
सर्वात कमी भाव, सर्वात कमी मजुरी..
दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी ₹ १९९/-*
2014 पासुन आपल्या सेवेत.. सोनेरी नातं..
चंदुकाका ज्वेल्स
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

# स्टेशन रोडवरील जुगार अड्ड्यावर छापा; लाखोंचा मुद्देमाल जप्त, २९ जण पकडले

नगर – शहरातील स्टेशन रोडवर सक्कर चौक ते रेल्वेस्टेशन रोडलगत पत्र्याचे शेडमध्ये सुरु असलेल्या जुगार अड्ड्यावर भिंगार कॅम्प पोलिसांच्या पथकाने छापा टाकत जुगार खेळणाऱ्या २९ जणांना पकडून त्यांच्या कडून ४ लाख ६७ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. हा जुगार अड्डा कोतवाली पोलिसांच्या हद्दीत असून पोलिस अधिक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार भिंगार कॅम्प पोलिसांच्या पथकाने ७ मे रोजी रात्री ११ च्या सुमारास ही कारवाई केली आहे.

पोलीस अधीक्षक सुदर्शन यांनी भिंगारचे स.पो.नि. जगदीश मुलगीर यांना फोनद्वारे माहिती दिली की, सक्कर चौक ते रेल्वेस्टेशन रोडलगत पत्र्याचे शेडमध्ये काही लोक तीन पत्ती नावाचा हारजितीचा जुगार खेळत व खेळवीत असुन तुम्ही तुमचे स्टाफसह सदर ठिकाणी जाऊन छापा टाकुन कारवाई करा असा आदेश दिले त्यानुसार स.पो.नि. जगदीश मुलगीर यांनी पथकासह छापा टाकुन जुगार खेळणाऱ्यांना पकडले.

त्यांची व सदर ठिकाणची झडती घेतली असता त्यांचेकडे २ लाख ३ हजार १० रुपये रोख रक्कम, २४ मोबाईल फोन व ६ मोटारसायकल असा एकुन ४ लाख ६७ हजार १० रुपयांचा मुद्देमाल मिळुन आला आहे. तो स.पो.नि.जगदीश मुलगीर यांनी पंचासमक्ष जागीच पंचनामा करुन जप्त केला आहे. या प्रकरणी पो.हे.कॉ रविंद्र टकले यांनी सदर आरोपीविरुद्ध कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली असून सदर आरोपीविरुद्ध महाराष्ट्र जुगार अधिनियम कलम १२ (अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदरची कारवाई ही पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे यांचे मार्गदर्शनाखाली स.पो.नि. जगदीश मुलगीर, पोलिस अंमलदार दिलीप शिंदे, नंदकुमार पठारे, रविंद्र टकले व प्रमोद लहारे तसेच कोतवाली पोलीस स्टेशनचे उपनिरीक्षक गणेश देशमुख व पोलीस अंमलदार यांनी केली असून सदर गुन्ह्याचा पुढील तपास पो.हे.कॉ भानुदास सोनवणे हे करत आहेत.

दुमजली घर विकणे आहे
योग्य किंमतीत
बालिकाश्रम रोड, लक्ष्मीमाता मंदीरा जवळ, तुलसी पार्क समोर, जाधव मळा, अहिल्यानगर
संपर्क वेळ : दु. ५ ते रात्री. ७.३० वा.
9730292394

# नगरमध्ये दीड कोटी रुपये किमतीची 'लाल सुपारी' पकडली; दोन ट्रक जप्त

नगर – कर्नाटक राज्यातून दिल्लीच्या दिशेने अवैधरीत्या वाहतूक होणारी सुमारे १ कोटी ४६ लाख १५ हजार २०० रुपये किमतीची लाल सुपारी अहिल्यानगर पोलिसांनी सापळा रचून पकडली आहे. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोठी कारवाई करण्यात आली असून, एम.आय.डी.सी. पोलीस ठाण्याच्या हद्दीत दोन ट्रक जप्त करण्यात आले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, गुटखा बनविण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या सुपारीचा मोठा साठा नगरमधून जाणार असल्याची गुप्त बातमी पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे व उपविभागीय अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे यांच्या पथकाने निंबळक बायपास रोडवर नाकेबंदी करून दोन संशयित मालवाहतूक ट्रक ताब्यात घेतले. तपासणी केली असता, पहिल्या ट्रकमध्ये ४५० गोण्या (३१,५०० किलो) आणि दुसऱ्या ट्रकमध्ये ३५० गोण्या (२४,५०० किलो) असा एकूण ५६ हजार किलो मुद्देमाल आढळला. कागदपत्रांची पूर्तता नसल्याने ही कारवाई करण्यात आली असून अन्न व औषध प्रशासन विभाग तसेच राज्यकर विभागाशी पत्रव्यवहार करण्यात आला आहे.

या मोहिमेत आर्थिक गुन्हे शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक शिशिरकुमार देशमुख, स.फौ. अजय नगरे, बाळासाहेब जंबे, सचिन जाधव, भरत बुधवंत, राजू जाधव, महेश मगर, किरण बनसोडे आणि सागर द्वारके यांच्या पथकाने महत्त्वाची भूमिका बजावली. पोलीस आता या प्रकरणातील मुख्य आरोपी आणि पुरवठादारांचा शोध घेत असून पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू आहे.

पैसा मिळतो पण टिकत नाही आणि कर्जही फिटत नाही...
नशीब म्हणावं की वास्तुदोष हेही समजत नाही...
अभ्यासपूर्ण भारतीय वास्तुशास्त्र आणि ज्योतिषी सल्ल्यासाठी...
डॉ. कौस्तुभ काळे
वास्तुवाचस्पती
9850941881

Up to 50% DISCOUNT
बाटा
सहकार सभागृहा समोर, माळीवाडा बसस्टॅण्ड, अहिल्यानगर

## खासदार निलेश लंके यांच्यावर पुण्यातील हॉस्पिटलमध्ये उपचार सुरु



नगर – खासदार निलेश लंके यांची प्रकृती गेल्या काही दिवसांपासून सततच्या धावपळीमुळे खालावली आहे. त्यांना पुढील उपचार आणि रुटीन तपासण्यांसाठी ८ मे रोजी पुण्याच्या रुबी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. डॉक्टरांनी त्यांना सक्तीची विश्रांती घेण्याचे निर्देश दिले असून सध्या त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात आले. गेल्या काही दिवसांपासून खासदार निलेश लंके जिल्ह्यात विविध सार्वजनिक कार्यक्रम आणि जनसंपर्क दौऱ्यांमध्ये व्यस्त होते. कडाक्याच्या उन्हात सातत्याने सुरू असलेल्या या धावपळीमुळे त्यांना शारीरिक अस्वस्थता जाणवू लागली होती. मागील दोन ते चार दिवसांपासून त्यांना सतत ताप जाणवत होता. पण त्यांनी त्याकडे दुर्लक्ष करुन लोकांच्या भेटीगाठी सुरुच ठेवल्या होत्या. त्यामुळे थकवा वाढत गेला. अखेर त्यांनी अहिल्यानगर येथील एका खासगी हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. मात्र, तेथून त्यांना ८ मे रोजी सकाळी पुण्याला हलविण्यात आले. पुण्याच्या रुबी हॉल क्लिनिकमध्ये खासदार लंके यांच्या काही रुटीन आरोग्य तपासण्या केल्या जाणार आहेत. त्यांच्या कार्यालयाकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, सद्यस्थितीत काळजी करण्याचे कोणतेही कारण नाही. केवळ सततच्या कामाचा ताण आणि थकवा यामुळे त्यांना काही दिवस रुग्णालयात विश्रांती घ्यावी लागणार आहे. दरम्यान माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी दुपारी रुबी हॉल क्लिनीकमध्ये खा. लंके यांची भेट घेतली. त्यानंतर माध्यमांशी बोलताना त्यांनी सांगितले की, खा. लंके यांची प्रकृती उत्तम आहे. त्यांना काही दिवस सक्तीचा आराम सांगितला आहे. कदाचित दोन दिवसात त्यांना दवाखान्यातून घरी सोडले जाईल. काळजी करण्याचे कोणतेही कारण नाही.

### लवकरच पूर्ण क्षमतेने सेवेत परतणार : निलेश लंके

आपल्या तब्येतीबाबत माहिती देताना खासदार निलेश लंके म्हणाले, रुटीन तपासण्या आणि योग्य उपचारांनंतर मी लवकरच पुन्हा एकदा आपल्या सेवेत पूर्ण क्षमतेने उपस्थित होईन. जनतेचे आशीर्वाद आणि सदिच्छा माझ्या पाठीशी आहेत, त्यामुळे कुणीही काळजी करू नये.

## नगर जिल्ह्याचा दहावीच्या परीक्षेचा ९२.६९ टक्के निकाल

नगर – महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या इ. १० वीच्या परीक्षेचा निकाल ८ मे रोजी दुपारी बोर्डाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन जाहीर झाला असून या निकालात नगर जिल्हा पुणे विभागात सलग दुसऱ्या वर्षीही तिसऱ्या क्रमांकावर फेकला गेला आहे. विभागात सर्वाधिक निकाल पुणे जिल्ह्याचा ९६.४६ टक्के त्यापाठोपाठ सोलापूर जिल्ह्याचा ९४.२४ टक्के तर नगर जिल्ह्याचा ९२.६९ टक्के लागला आहे.

जिल्ह्यात यावर्षी ६८ हजार ४७७ विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी नोंदणी केली होती. त्यापैकी ६७ हजार ९७० विद्यार्थी परीक्षेस बसले. त्यापैकी ६३ हजार ४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. त्यात ३४ हजार ३ मुले व २९ हजार १ मुली आहेत. मुला – मुलींचे उत्तीर्ण होण्याचे शेकडा प्रमाण मुले ९०.४० टक्के तर मुली ९५.५३ टक्के एवढे आहे.

तालुकानिहाय निकालाची टक्केवारी : अकोले ९५.८२, जामखेड ९३.९४, कर्जत ९३.३५, कोपरगाव ९२.७०, नगर ९३.०८, नेवासा ८९.८९, पारनेर ९५.४४, पाथर्डी ९२.२०, राहाता ९१.८८, राहुरी ९२.४९, संगमनेर ९५.१९, शेवगाव ८५.७४, श्रीगोंदा ९६.१३, श्रीरामपूर ८९.५८ असा एकूण निकाल लागला आहे.

महेंद्र पेडावाला
रजवाडी गुजराती थाळी
पार्सल सुविधा उपलब्ध..
स्पेशल आमरस 400/- किलो
रेल्वे पार्सल, किटी पार्टी व बर्थडे पार्टीसाठी खास सोय
कापड बाजार, अहिल्यानगर.


पाचवे पुण्यस्मरण
कर्तृत्वान व्यक्तिमत्त्व
आदर्श विचारांचा सुगंध
संस्मरित करतो आम्हाला
नित्यस्मरण आपुले
आज प्रत्येक क्षणाक्षणाला..
आपल्या पावन स्मृतिस भावपूर्ण श्रद्धांजली..
कै. रोहिदास प्रभाकर गिते
स्व. दि. ०८/०५/२०२१
* दु:खांकित *
प्रभाकर पुंजाजी गिते (वडील)
अंबादास प्रभाकर गिते (भाऊ) | कैलास प्रभाकर गिते (भाऊ)
अनुज अंबादास गिते (पुतण्या) | अविष्कार कैलास गिते (पुतण्या)
राज रोहिदास गिते (मुलगा) | श्रेयश रोहिदास गिते (मुलगा)
समस्त गिते परिवार
सारसनगर, अहिल्यानगर. मो. 9890959280
गाळा नं. १०, कृषी उत्पन्न बाजार समिती, मार्केटयार्ड, अहिल्यानगर

जपल्या आहेत जरी मनी, साऱ्या तुमच्या आठवणी
उणीव भासते आम्हा तुमची, सुख-दु:खाच्या प्रत्येक क्षणी
तृतीय पुण्यस्मरण

स्व. राहुल अनिल रच्चा
स्व. ९/५/२०२३
आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली!
* आपले शोकाकूल *
अनिल नारायण रच्चा । सौ. पद्मजा अनिल रच्चा
अमोल अनिल रच्चा
श्रीमती सुनंदा राहुल रच्चा । सौ. अपर्णा रणजित कुंदेन (बहीण)
समस्त रच्चा परिवार

SONI TILES AND MARBLE INDUSTRIES
Since 1965
Wholesalers & Manufacturers of -
Ceramic Wall & Floor Tiles,
Vitrified Tiles, Paving Blocks,
Marble & Granite
सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज
Opp. Munot Estate, Station Road,
Ahmednagar. Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## बंद घर फोडून सोन्या-चांदीचे दागिने व रोकड पळविली

नगर - शहरातील अमितनगर भागात घरफोडीची घटना ७ मे रोजी पहाटे घडली असून, अज्ञात चोरट्यांनी बंद घराचे कुलूप तोडून सुमारे ९० हजार ४८२ रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने आणि रोकड लंपास केली आहे. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत प्रकाश शंकरराव कुवर (वय ७५, रा. श्रीकृष्णनगर, कल्याण रोड) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांची मुलगी अमित नगर भागात राहात असून सुट्टीनिमित्त ती गुजरातला गेली होती. घराची जबाबदारी एका मित्रावर सोपवण्यात आली होती. ६ मे रोजी रात्री घराला व्यवस्थित कुलूप लावलेले असताना, मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी संधी साधून घरात प्रवेश केला. कपाटातील ४.९३० ग्रॅमची सोन्याची अंगठी, चांदीचे ब्रेसलेट, सोन्याची माळ आणि रोख रक्कम असा एकूण ९० हजार ४८२ रुपयांचा मुद्देमाल चोरीला गेला आहे. पहाटेच्या सुमारास चोरीचा प्रकार उघडकीस आला. मुलीने मोबाईल वर फोन करून वडिलांना माहिती दिल्यानंतर कुवर यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यावेळी घरातील सामान अस्ताव्यस्त पडले होते. त्यांनी याबाबत कोतवाली पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. या प्रकरणी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक प्रवीण पाटील या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

# ग्रामीण भागात पाण्याची तीव्र समस्या; तर नगर शहरात व्हॉल्वमनचा कर्कशा

### पाण्यासाठी मुख्यमंत्र्यांकडे अहिल्यानगरमधून साकडे



प्रमोदकुमार छाजेड

नगर - उन्हाळ्याच्या तीव्रतेसोबतच अहिल्यानगर जिल्ह्यात पाणी प्रश्नाने रौद्र रूप धारण केले आहे. एकीकडे ग्रामीण भागात पाणी टंचाईचा प्रशन गंभीर बनत चालला आहे. तर दुसरीकडे शहरात पाणी सोडण्यावरून व्हॉल्वमनच्या अरेरावीमुळे नगरसेवक आणि नागरिक हैराण झाले आहेत. ग्रामीण भागातील पाणी टंचाईबाबत थेट मुख्यमंत्र्यांना साकडे घालण्यात आले आहे.

शेवगाव तालुक्यातील पूर्व भागात पाणीटंचाईचा प्रश्न गंभीर झाला आहे. लाडजळगाव येथील शेतकरी प्रतिनिधी प्रमोदकुमार ताराचंद छाजेड यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना ईमेलद्वारे निवेदन पाठवून पाणी टंचाईच्या प्रश्नावर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. या निवेदनात प्रामुख्याने धनगर वस्ती व कोकटवाडी येथील पाझर तलावांच्या दुरुस्तीची आणि खोलीकरणाची मागणी करण्यात आली आहे. तलावांच्या भिंतींमधून होणारा पाझर थांबल्यास परिसरातील विहिरींची पाणीपातळी वाढून शेतकरी व पशुपालकांना मोठा दिलासा मिळेल, असे छाजेड यांनी म्हटले आहे. तसेच, गोळेगाव येथील ५० वर्षे जुन्या तलावाचे मध्यम प्रकल्पात रूपांतर केल्यास परिसरातील १५ ते २० गावांचा पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सुटू शकतो, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



महापालिकेच्या बैठकीत आयुक्त यशवंत डांगे यांच्यासमोर व्हॉल्वमनच्या अरेरावीबाबत तक्रार करताना नगरसेवक निखिल वारे, बाळासाहेब पवार आदी. (छाया - लहू दळवी)

## अहिल्यानगर महापालिका कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याचा आयुक्तांचा इशारा

अहिल्यानगर शहरातील प्रभाग क्रमांक २ मध्ये गेल्या दोन महिन्यांपासून पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे. या प्रश्नावरून आयुक्त यशवंत डांगे यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या बैठकीत नगरसेवक निखिल वारे आणि माजी नगरसेवक बाळासाहेब पवार यांनी व्हॉल्वमनच्या तक्रारींचा पाढाच वाचला. काही कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे आणि नागरिकांशी केलेल्या उद्धट वर्तनामुळे पाणीपुरवठा व्यवस्थेचा बोजवारा उडाल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. त्यामुळे कामचुकार कर्मचाऱ्यांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी वारे यांनी महापालिका आयुक्तांकडे केली.

परिस्थितीचे गांभीर्य ओळखून आयुक्त यशवंत डांगे यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांना ८ दिवसांची मुदत दिली आहे. या काळात सुधारणा न झाल्यास कडक कारवाईचा इशारा त्यांनी दिला आहे.

व्हॉल्वमनने प्रत्येक कॉलनीचा व्हॉट्सप ग्रुप करून पाणी सोडण्याच्या एक तास आधी संदेश द्यावा, पाणी सोडल्यानंतर भागात जाऊन पाणी पोहोचल्याची खात्री करावी व नागरिकांच्या सह्यांचे रजिस्टर ठेवावे, जो कर्मचारी काम करणार नाही, त्याच्या पगार बिलावर सुपरवायझरने सही करू नये, असे निर्देश महापालिका आयुक्त डांगे यांनी दिलेले आहेत.

या बैठकीस इंजिनिअर गणेश गाडळकर, प्रदीप ढगे, लहानू निंभे यांसह पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी उपस्थित होते. महावितरणच्या खंडित वीजपुरवठ्याबाबत पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून तोडगा काढण्याचे आश्वासनही यावेळी देण्यात आले.

## महिला परिचरांचे तीन महिन्यांचे मानधन रखडले; राज्यभर तीव्र आंदोलन करणार : महिलांचा इशारा

नगर - अंशकालीन महिला परिचरांना मागील अनेक महिन्यांपासून वेतनासाठी संघर्ष करावा लागत आहे. जुलै, ऑगस्ट आणि सप्टेंबर २०२५ या तीन महिन्यांचे थकीत मानधन अद्याप मिळालेले नाही. हे मानधन तातडीने अदा करावे, अन्यथा राज्यभर तीव्र आंदोलन करण्याचा इशारा महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद महिला परिचर संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे.



जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बापूसाहेब नागरगोजे यांना निवेदन देताना महिला परिचर कर्मचारी संघटनेचे पदाधिकारी.

महिला परिचरांनी विविध प्रलंबित मागण्यांसाठी आणि थकीत वेतनासाठी जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालयावर ६ मे रोजी मोर्चा काढून जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बापूसाहेब नागरगोजे यांना संघटनेच्या वतीने मागण्यांचे निवेदन देण्यात आले. तसेच संघटनेच्या मागण्या मान्य न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा या निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. यावेळी सीटूचे जिल्हा समन्वयक कॉम्रेड प्रवीण सोनवणे यांनी जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांशी चर्चा करताना प्रशासनाचे कान टोचले. या चर्चे दरम्यान त्यांनी नमूद केले की, संबंधित महिला परिचरांपैकी बहुतेक महिला या एकल महिला आहेत आणि त्या शासनाकडे अत्यंत तुटपुंज्या पगारावर काम करत आहेत. अशा परिस्थितीत शासनाने त्यांना पगारासाठी वेठिस धरू नये. याबाबतीत शासनाकडून येणाऱ्या काळात कोणत्याही प्रकारे त्यांच्या वेतनात विलंब करू नये; त्यांचे वेतन प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेलाच व्हावे. तसेच, महिला परिचरांना पगारवाढीच्या संदर्भात केलेल्या घोषणांची अंमलबजावणी तात्काळ करावी, या मुद्द्यांवर त्यांनी सविस्तर चर्चा केली.

संप काळातील जुलै ते सप्टेंबर २०२५ या कालावधीचे थकीत मानधन त्वरित जमा करावे, दर महिन्याच्या ५ तारखेच्या आत मानधन नियमितपणे जमा व्हावे, पगारवाढीच्या घोषणांची तात्काळ अंमलबजावणी करावी, प्राथमिक आरोग्य केंद्रांवरील दिवस पाळी लावण्याची पद्धत बंद करावी, महिला परिचरांना सन्मानाची वागणूक मिळावी, दरवर्षी गणवेश व भाऊबीज भत्ता देण्यात यावा आणि प्रधानमंत्री अपघात विमा योजना लागू करण्यात यावी, अशा मागण्या निवेदनात करण्यात आल्या आहेत.

संघटनेच्या जिल्हाध्यक्षा कल्पना धनवटे आणि सीटूचे जिल्हा समन्वयक कॉम्रेड प्रवीण सोनवणे यांनी सांगितले की, जर प्रशासनाने त्वरित मागण्या मान्य केल्या नाहीत आणि थकीत मानधनाचा प्रश्न मार्गी लावला नाही, तर येणाऱ्या काळात राज्यभर तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा त्यांनी दिला. यावेळी अकोला तालुकाध्यक्ष सविता काळे, राहाता तालुकाध्यक्ष छाया थोरात, अहिल्यानगर तालुकाध्यक्ष प्रतिभा सोनवणे, पाथर्डी तालुकाध्यक्ष कांता गायकवाड, नेवासा तालुका सचिव मंदाताई अस्वले, उषाताई केदारी, शेवगाव तालुका अध्यक्ष प्रतिभा केसभट, राहुरी तालुका सचिव सुनिता गागरे, लता लिंगे, अनिता हजारे, रोहिणीताई सोनवणे, रोहिणी धस आदी महिला उपस्थित होत्या.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पालकमंत्री सांस्कृतिक महोत्सवानिमित्त अहिल्यानगर शहरामध्ये 'चित्रकला आणि निबंध स्पर्धांचे' आयोजन

**विद्यार्थ्यांपासून खुल्या गटापर्यंत सहभागाचे आवाहन, ११ ते १५ मे अर्ज वितरण, २० ते २२ मे स्पर्धा साहित्य जमा करण्याची मुदत**

नगर - सांस्कृतिक मंत्रालय, महाराष्ट्र शासन आणि अहिल्यानगर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पालकमंत्री सांस्कृतिक महोत्सवानिमित्त शहरात चित्रकला व निबंध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांना तसेच नागरिकांना अहिल्यादेवी होळकर यांच्या महान कार्याचा परिचय होणार असून त्यांच्या विचारांचे जतन व संवर्धन करण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

स्पर्धेसाठी अर्ज व साहित्य घेण्याची व्यवस्था शहरातील विविध ठिकाणी करण्यात आली असून ११ ते १५ मे या कालावधीत स्पर्धकांनी फॉर्म संबंधित केंद्रांवरून घ्यावेत. तर २० ते २२ मे या कालावधीत पूर्ण केलेले चित्र किंवा निबंध पुन्हा त्याच केंद्रांवर जमा करावेत, अशी माहिती पालकमंत्री सांस्कृतिक महोत्सव समितीच्या वतीने देण्यात आली आहे.

स्पर्धेसाठी पेपर कोणार्क हार्डवेअर तपोवन रोड, सूर्यकांत फर्निचर (श्रीराम चौक), अरुणोदय मेडिकल (भिस्तबाग चौक), प्रा. अशोक डोळसे यांचे निवासस्थान (साधना सोसायटी, प्रोफेसर कॉलनी), पारिजात कॉर्नर (पारिजात चौक), गणेश कर्टन (नायरा पंपजवळ, बालिकाश्रम रोड), शिंदे डायग्नोस्टिक सेंटर (बालिकाश्रम रोड), जाधव मळा येथील उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांचे संपर्क कार्यालय, सिद्धेश्वर मेडिकल (विशाल गणपती मंदिर, माळीवाडा), महालक्ष्मी मल्टी टेस्ट सोसायटी (बुरुडगाव रोड, चाणक्य चौक), अक्षय सुगंधालय (डाळ मंडई), नगरसेवक सुजय मोहिते यांचे संपर्क कार्यालय (लिंक रोड, केडगाव), जलाराम बेकर्स (केडगाव), नंदकुमार गुजराती (भिंगारवाला चौक) तसेच गुजराती भोजनालय शेजारी अशा अनेक केंद्रांवर फॉर्म उपलब्ध असणार आहेत.

चित्रकला स्पर्धेत इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी बांधलेला घाट, अहिल्यादेवी होळकर यांचे व्यक्तिचित्र आणि त्यांच्या जीवनातील प्रसंग हे विषय देण्यात आले आहेत. तर महाविद्यालयीन व खुल्या गटासाठी अहिल्यादेवी होळकर यांनी बांधलेले शिवमंदिर, त्यांचे व्यक्तिमत्त्व आणि त्यांच्या स्मारकाची कल्पना हे विषय निश्चित करण्यात आले आहेत.

निबंध स्पर्धेत शालेय गटासाठी अहिल्यादेवी होळकरांचे जीवन - राष्ट्रीय एकात्मतेची यशोगाथा आणि अहिल्यादेवी होळकर - एक कुशल संघटक हे विषय देण्यात आले आहेत. खुल्या गटासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य आणि त्यांचे जीवनचरित्र - महिला सबलीकरणाचे उदाहरण हे विषय निश्चित करण्यात आले आहेत.

या स्पर्धांमधून विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाची जाणीव, सर्जनशीलता आणि विचारप्रवृत्ती विकसित होण्यास मदत होणार आहे. तसेच अहिल्यादेवींच्या कार्याचा अभ्यास करताना समाजासाठी प्रेरणादायी विचार आत्मसात करण्याची संधीही मिळणार आहे.

माहितीसाठी पुष्कर कुलकर्णी (८८३०१५९०८३), चंद्रकांत तागड (९४२२२२६१५३२), अशोक डोळसे (९८९०२६९६९८) तसेच राधाकृष्ण जोशी (७९७२२३६८४४) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

### तात्यासाहेब पवार यांचे हृदयविकाराने निधन



नगर - चिचोंडी पाटील येथील रहिवासी तात्यासाहेब पवार (वय ४२) यांचे ८ मे रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर चिचोंडी पाटील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, आई, २ भाऊ, भावजया, १ मुलगा, पुतणे असा परिवार आहे. स्व. रामराव पवार यांचे ते चिरंजीव होत.

### देवानंद सोनवणे यांचे अल्प आजाराने निधन



श्रीरामपूर - येथील बसस्थानक समोरील समाधान टी सेंटरचे मालक देवानंद मुकुंदराव सोनवणे (वय ६३) यांचे अल्प आजाराने दुखःद निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी, तीन भाऊ, एक बहीण, दोन मुले, एक मुलगी, सुना, पुतणे जावई, नातवंडे असा परिवार आहे. श्रीराम तरुण मंडळाचे अध्यक्ष सुरेश सोनवणे, नारायण व संतोष सोनवणे यांचे बंधू, स्वप्नील सोनवणे व कुणाल सोनवणे यांचे वडील होत.

### सैय्यद आरीफ अहमद यांचे निधन



नगर - शहरातील माळीवाडा बस स्टँड समोरील सत्कार हॉटेलचे मालक सैय्यद आरीफ सैय्यद अहमद (वय ६९) यांचे २९ एप्रिल रोजी निधन झाले.

त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, पुतणे असा परिवार आहे. त्यांचा दफनविधी स्टेशन रोड येथील हाजी हसनशाह कादरी कब्रस्तान येथे मुस्लिम धर्मीय परंपरेनुसार करण्यात आला.

## बीच कॉर्फबॉल विश्वचषक स्पर्धेत भारताची विक्रमी कामगिरी

**नगरचा दिशान गांधी चमकला**

नगर - बँकॉक, थायलंड येथे नुकत्याच पार पडलेल्या बीच कॉर्फबॉल विश्वचषक स्पर्धेत भारतीय संघाने दमदार प्रदर्शन करीत आजपर्यंतची सर्वोच्च कामगिरी करून दाखवली. या स्पर्धेत भारतीय संघाला पाचवा क्रमांक मिळाला. भारतीय संघात महाराष्ट्रातून एकमेव खेळाडू अहिल्यानगरच्या दिशान किशोर गांधी याचा समावेश होता. दिशानने पुन्हा एकदा सर्वोत्कृष्ट खेळ करीत भारतीय संघाच्या कामगिरीत सिंहाचा वाटा उचलला.

भारताच्या संघाने आपल्या गटातील चीन, जपान, थायलंड या संघाचा सहज पराभव केला. भारताला हंगेरी, चेक रिपब्लिक संघाकडून निसटता पराभव पत्करावा लागला. स्पर्धेत हंगेरीला विजेतेपद तर तैवानला उपविजेतेपद मिळाले. चेक रिपब्लिकला तृतीय तर ऑस्ट्रेलियाला चतुर्थ क्रमांक मिळाला. भारताच्या दिशान गांधी याने संरक्षण व आक्रमणाचा सुरेख संगम दाखवत प्रतिस्पर्धी संघांना अनेक गोल करण्यापासून रोखले व भारतासाठी डझनभर गोल केले. दिशान सातत्याने आंतरराष्ट्रीय पातळीवर चमकदार कामगिरी करून अहिल्यानगरचे नाव रोशन करीत आहे.

या यशाबद्दल आ. संग्राम जगताप, अ.नगर कॉर्फबॉल असोसिएशनचे अध्यक्ष पद्मश्री पोपटराव पवार, डॉ.प्रकाश कांकरिया व सर्व पदाधिकारी, अ.नगर एज्युकेशन सोसायटीच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया, प्राचार्य भाबड, हिंद सेवा मंडळाचे सचिव संजय जोशी, मर्चंटस बँकेचे चेअरमन हस्तीमल मुनोत, पंडीत दिनदयाळ परिवाराचे वसंत लोढा, बॉलर्स क्लबचे हर्षल सेलोत व सर्व खेळाडू, आयकॉन स्कूलच्या मंजू मुथा, बीड नवगण राजुरी येथील एनएसएसआर कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशनचे प्राचार्य, माने सर, खान सर यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.



बँकॉक, थायलंड येथे नुकत्याच पार पडलेल्या बीच कॉर्फबॉल विश्वचषक स्पर्धेत भारतीय संघाने दमदार प्रदर्शन करीत आजपर्यंतची सर्वोच्च कामगिरी करून दाखवली.

## जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याच्या गंभीर गुन्ह्यात आरोपीला अटकपूर्व जामीन मंजूर

नगर - शेतजमिनीच्या वादातून लोखंडी रॉडने हल्ला करून जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याच्या गंभीर गुन्ह्यातील आरोपीला मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे. अहिल्यानगर जिल्हा न्यायालयाने यापूर्वी आरोपीचा जामीन अर्ज फेटाळून लावला होता. मात्र उच्च न्यायालयाने कायदेशीर बाबी आणि वकिलांचा युक्तिवाद ग्राह्य धरून आरोपीला दिलासा दिला आहे.

अहिल्यानगर तालुक्यातील शिंगवे नाईक येथील रहिवासी बाळासाहेब भाऊसाहेब जाधव व इतर यांच्यात शेताच्या सामाईक बांधावरून वाद सुरू होते. या वादातून आरोपींनी फिर्यादीच्या वडिलांच्या डोक्यात व पायावर लोखंडी रॉडने मारहाण केली, तसेच इतर नातेवाईकांनाही मारहाण केली होती. या घटनेप्रकरणी एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपींनी अटक टाळण्यासाठी प्रथम अहमदनगर येथील जिल्हा न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला होता, मात्र तो न्यायालयाने नामंजूर केला. त्यानंतर ॲड. महेश नारायण कोतकर यांच्यामार्फत आरोपीने उच्च न्यायालयात धाव घेतली. उच्च न्यायालयात आरोपीचे वकील ॲड. ए. बी. चोरमल यांनी युक्तिवाद करताना न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले की, आरोपीवर दाखल करण्यात आलेला गुन्हा हा खोट्या स्वरूपाचा आहे. वकिलांनी मांडलेल्या इतर तांत्रिक बाबी आणि युक्तिवाद लक्षात घेऊन मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने आरोपीचा अटकपूर्व जामीन मंजूर केला.

या प्रकरणात आरोपीच्या वतीने ॲड. ए. बी. चोरमल यांनी कामकाज पाहिले. तर त्यांना ॲड. महेश नारायण कोतकर यांनी सहकार्य केले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### वारंवार तहान लागते का?

या कडक उन्हाच्या आणि तीव्र सूर्यप्रकाशाच्या ऋतूत, घसा कोरडा पडणे आणि वारंवार तहान लागणे या सामान्य गोष्टी आहेत. लोक अनेकदा याकडे दुर्लक्ष करतात, त्यांना वाटते की हा केवळ उष्णतेचा परिणाम आहे. पण तुम्हाला माहित आहे का की, पुरेसे पाणी प्यायल्यानंतरही जर तुमचे तोंड सतत कोरडे पडत असेल, तर ती केवळ तहान नसून तुमच्या शरीराकडून आलेला एक गंभीर धोक्याचा इशारा आहे. उन्हाळ्यात शरीरातील पाण्याची पातळी टिकवून ठेवण्यासाठी केवळ साधं पाणी पुरेसं नाही. आपल्या आहारात लिंबू पाणी, नारळ पाणी आणि ओआरएस द्रावणाचा समावेश करा. टरबूज, खरबूज, काकडी आणि मुळा यांसारख्या जास्त पाणी असलेल्या फळांच्या सेवनात वाढ करा. चहा, कॉफी आणि शीतपेयांचे सेवन कमी करा, कारण त्यामुळे शरीरातील पाण्याची पातळी आणखी कमी होते. ताजेपणासाठी पाण्यात पुदिन्याची पाने घालून ते पाणी प्या.

## पाककला

### लसूण-पुदीना रायते

**साहित्य :** घट्ट दही: २ कप (चांगले फेटलेले), ताजी पुदिना पाने: १/२ कप, लसूण पाकळ्या: ४ ते ५ (छोट्या असल्यास ६-७), हिरवी मिरची: १ (बारीक चिरलेली किंवा वाटलेली), भाजलेली जिरे पूड: १ छोटा चमचा, काळं मीठ: १/२ छोटा चमचा, साधे मीठ: चवीनुसार, लाल तिखट: चिमूटभर (सजावटीसाठी)

**कृती :** सर्वात आधी पुदिना पाने, लसूण आणि हिरवी मिरची एकत्र करून खलबत्त्यात किंवा मिक्सरमध्ये जाडसर वाटून घ्या. (लसूण कच्चा वापरल्यामुळे उग्र वास येतो, जर तुम्हाला तो आवडत नसेल तर लसूण थोडा तेलावर परतून घेऊ शकता). आता एका मोठ्या बाऊलमध्ये दही घेऊन ते रवीने किंवा विस्करने छान एकजीव करून घ्या. दही खूप घट्ट वाटल्यास थोडे पाणी किंवा दूध घालू शकता. फेटलेल्या दह्यात तयार केलेली पुदिना-लसूण पेस्ट, भाजलेली जिरे पूड, काळं मीठ आणि साधे मीठ घालून व्यवस्थित मिक्स करा. रायत्यावर वरून थोडी जिरे पूड आणि सजावटीसाठी बारीक चिरलेला पुदिना किंवा चिमूटभर लाल तिखट भुरभुरा, तर चला तयार आहे आपले लसूण-पुदिन्याचे थंडगार रायता, जेवणासोबत नक्कीच ट्राय करा.

## वास्तू

### आर्थिक लाभासाठी

स्वयंपाकघराची ईशान्य दिशा पाणी साठवण्यासाठी सर्वोत्तम मानली जाते. ही दिशा देवतांची दिशा मानली जाते. येथे पाण्याने भरलेले भांडे किंवा ग्लास ठेवल्याने घरात सकारात्मक ऊर्जेचा प्रवाह वाढतो आणि देवी लक्ष्मीचे आमंत्रण मिळते. ईशान्य दिशेला जागा नसल्यास, तुम्ही उत्तरेकडेही पाणी ठेवू शकता. ही कुबेराची दिशा आहे, जी आर्थिक लाभासाठी नवीन संधी निर्माण करते. मात्र पाण्याचा ग्लास किंवा भांडे थेट चुलीजवळ कधीही ठेवू नका

## सौंदर्य

मान खोल किंवा हेवी नेकऐवजी पाठीवर सुंदर डिझाइन असलेला ब्लाऊज घ्या. यामुळे लुक एलिगंट दिसतो. स्लिव्हलेस ब्लाऊज टाळा. थ्री-क्वार्टर किंवा फुल स्लीव्ह चांगले दिसतात.

## सल्ला

उन्हाळ्यात सुती आणि सैल कपडे घालण्याला प्राधान्य द्या. यामुळे घाम लवकर शोषला जातो आणि त्वचेला हवा लागते. पांढरा किंवा फिकट रंग उष्णता परावर्तित करतात. त्यामुळे फिकट रंगाचे कपडे वापरावेत.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

शनिवार, दि. ९ मे २०२६

**कालाष्टमी, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, वैशाख कृष्णपक्ष, श्रवण २३।२५, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०५ वा. २९ मि.**

## राशिभविष्य

**मेष :** चांगले भोजन मिळेल. मौजमजेत दिवस व्यतीत होईल. एखाद्या महत्वाच्या व्यक्तीशी भेट झाल्याने आनंद होईल.

**वृषभ :** खाद्या महत्त्वाच्या व्यक्तीची भेट आपल्यासाठी आनंदाची ठरेल. धार्मिक कार्यांमध्ये खर्च होण्याची शक्यता आहे.

**मिथुन :** कला क्षेत्रात यश मिळण्याची शक्यता आहे. आपणास नवे वाहन मिळण्याची शक्यता आहे. मानसन्मानात वाढ होईल.

**कर्क :** एखाद्या जीवलगाबरोबर भागीदारीसाठी वैयक्तिक पातळीवर संबंध वाढविण्याचा प्रयत्न कराल. यशस्वी व्हाल.

**सिंह :** आपल्या जुन्या लोकांबरोबर किंवा आधार देणाऱ्या मित्रांना जोडणे या वेळी आपल्यासाठी फलदायी ठरेल.

**कन्या :** कौटुंबिक विषयांमध्ये पैसा खर्च होईल. व्यापार-व्यवसायात स्थिती संमिश्र राहील.

**तूळ :** इतर लोकांना आपल्या स्वतःच्या आवश्यकता व इच्छा सांगण्यासाठी ही उत्तम वेळ आहे.

**वृश्चिक :** आजचा दिवस कालच्या दिवसापेक्षा चांगला नसेल. आरोग्याची काळजी घ्या. व्यस्त राहाल.

**धनु :** मानसिक स्थिती आल्हाददायक राहील व वरिष्ठांबरोबर संपर्कात आल्याने प्रसन्न वातावरण राहील. संततीसौख्य लाभेल.

**मकर :** आपला जोडीदार आपणास भावनात्मक पाठबळ देईल. मित्रांमध्ये होणारे वाद आपल्या संबंधासाठी वाईट ठरतील.

**कुंभ :** आर्थिक विषयांमध्ये आपले प्रयत्न आपणास यश मिळण्याचे कारण ठरतील. वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून समर्थन मिळेल.

**मीन :** आज आपणास कठोर श्रम करावे लागतील. काही निष्कारण चिंतांमुळे आपली व्यग्रता वाढेल.

## शब्दगंध क्र. ७४२५ सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ■ | ४ | ■ | ५ |
| ६ | | ■ | ७ | ८ | | | |
| | ■ | ९ | | | ■ | ■ | ■ |
| ■ | १० | ■ | ११ | | १२ | १३ | |
| १४ | | १५ | | ■ | १६ | | ■ |
| | ■ | १७ | | ■ | १८ | | १९ |
| | ■ | २० | | २१ | | ■ | |
| २२ | | ■ | ■ | | ■ | २३ | |

**आडवे शब्द :-** १) रचना; नकली; घडण ६) कवाड; द्वार; दरवाजा ७) परंपरेने चालत आलेले ९) अखंड; न तुटता ११) सायंकाळ; संध्याकाळ १४) रोजची आवश्यक कामे; नित्याची राहणी १६) आई; जननी; माय १७) ओढा; रोख; झोक १८) वळण २०) बंदुकीत गोळी न घालता नुसती दारू घालून काढलेला आवाज २२) ईश्वर; देव २३) चार बाजूंनी पाणी व मध्ये जमीन असा प्रदेश

**उभे शब्द :-** १) कडक कवच असलेले एक फळ २) बाई; महिला; स्त्री ३) 'पोस्ट ऑफीस'चे मराठी रूप; डाकघर ४) अधर्म; पातक ५) घाऊक; किरकोळ नसलेले ८) मौज; आनंद; मन रमेल असे १०) ऐकण्याचे इंद्रिय; कर्ण १२) लक्ष्मीपती; विष्णू १३) भुतांचा राजा १४) विलंब; उशीर १५) भूल पाडणारे भूत १९) छाया; सावली २१) आंब्याचे बी; कोय

### शब्दगंध क्र. ७४२४ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| भा | र | द्वा | ज | ■ | अ | म | र |
| ज | ■ | द | ळ | ण | व | ळ | ण |
| क | पा | शी | ■ | ■ | जा | ■ | गा |
| ■ | रं | ■ | रा | म | र | ग | डा |
| उ | प | रा | ■ | णी | ■ | ण | ■ |
| पा | रि | जा | त | ■ | चि | ना | ब |
| स | क | ■ | ब | क | ■ | य | ■ |
| ना | ■ | वि | ला | स | ■ | क | र्ण |

### फिल्मीचक्कर क्र. १२३५ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| मि | ल | ती | है | जिं | द | गी | मे |
| ल | ■ | ■ | के | ■ | म | त | ■ |
| न | ■ | ■ | मा | या | ■ | ग | ता |
| ■ | उ | ड | न | ■ | सा | या | ■ |
| आ | प | ■ | ता | रा | ■ | प | ■ |
| ■ | का | नू | न | ■ | प | त्थ | र |
| प्या | र | ■ | ही | र | ■ | रों | ■ |
| सा | ■ | ■ | ■ | ती | ■ | ने | हा |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार :** हार ही आधी मनात होत असते, मग रणात होत असते.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### नारळाच्या आत पाणी कुठून येते?

जगभरात अशी अनेक ठिकाणे आहे जिथे अनोखी फळे तयार होतात. ही अनोखी फळे आणि त्यांचे दुर्मिळ गुणधर्म त्यांना जगभरात प्रसिद्ध करतात. तथापि, भारत अनोख्या फळांच्या उत्पादनात मागे नाही. शेतीप्रधान देश असलेल्या भारतात, तुम्हाला अशाच प्रकारच्या दुर्मिळ फळांची विविधता आढळेल ज्यांची केवळ एक वेगळी चवच नाही तर त्यात अनेक निरोगी पोषक घटक देखील आहे. आज, आम्ही तुम्हाला अशाच एका स्वादिष्ट फळाबद्दल, नारळाबद्दलच्या या विचित्र तथ्यांबद्दल सांगणार आहोत. तुम्ही कधी विचार केला आहे का की नारळाच्या आत पाणी कुठून येते? निसर्गाचा हा चमत्कार कसा घडतो?

नारळ कोणत्या देशाचे राष्ट्रीय फळ आहे?

नारळ हे मालदीवचे राष्ट्रीय फळ आहे. हे एक प्रमुख उष्णकटिबंधीय फळ आहे जे बेट राष्ट्राच्या संस्कृती आणि अर्थव्यवस्थेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. ते मालदीवच्या लोगोचा देखील एक भाग आहे, जे तेथील लोकांसाठी त्याचे महत्त्व प्रतिबिंबित करते. इंडोनेशिया, फिलीपिन्स आणि भारत हे जगातील सर्वात मोठे नारळ उत्पादक देश आहेत.

भारतात नारळाचे महत्त्व - भारतात नारळाचे धार्मिक, सामाजिक आणि आर्थिक महत्त्व खूप आहे. भारतात ते सामान्यतः 'श्रीफळ' म्हणून ओळखले जाते. नारळ शुद्धता, समृद्धी आणि शुभतेचे प्रतीक मानले जाते आणि ते विधी, विवाह आणि नवीन उपक्रमांच्या सुरुवातीला वापरले जाते. आरोग्य आणि उपजीविकेसाठी हे बहुमुखी पीक आहे.

नारळ पाणी कुठून येते?

नारळाचे पाणी हे झाडाच्या मुळांद्वारे जमिनीतून शोषले जाणारे भूजल आहे. ते पोषक तत्वांनी समृद्ध आहे. हे पाणी जाइलम नावाच्या संवहनी प्रणालीद्वारे खोडातून फळांपर्यंत जाते, जिथे ते झाड स्वतःच फिल्टर करते. ते वाढत्या नारळासाठी पोषक तत्व म्हणून काम करते.

नारळाचे पाणी गोड का लागते?

नारळाच्या पाण्याची गोड चव त्याच्या नैसर्गिकरित्या होणाऱ्या साखरेमुळे असते. हे एक नैसर्गिक पेय आहे जे नारळाचे झाड बाहेरील साखरेपासून नव्हे तर मुळांमधून मातीतून पोषक तत्वे शोषून फळांमध्ये साठवते. जे खुप पौष्टीक असते.

## हत्तींची भेट

राजा कृष्णदेवराय वेळोवेळी तेनालीरामाला मौल्यवान भेटवस्तू देत असे. एकदा, प्रसन्न होऊन राजाने त्याला पाच हत्ती भेट दिले. अशी भेट मिळाल्यावर तेनालीरामाला खूप दुःख झाले. गरीब असल्यामुळे, पाच हत्तींचा खर्च तेनालीरामाला परवडत नव्हता, कारण त्यांना खाऊ घालण्यासाठी खूप धान्य लागत असे.

तेनालीराम स्वतःच्या कुटुंबाचा नीट सांभाळ करू शकत नव्हता, त्यामुळे पाच हत्तींचा अतिरिक्त खर्च त्याच्यासाठी अत्यंत कठीण होता. तरीही, फारसा विरोध न करता, तेनालीरामाने ते हत्ती राजेशाही भेट म्हणून स्वीकारले आणि त्यांना घरी आणले.

घरी, तेनालीरामाची पत्नी सतत तक्रार करत असे, आपण स्वतःच नीट जगू शकत नाही, मग या हत्तींच्या राहण्याची सोय कुठे करायची? आपण त्यांच्यासाठी नोकरसुद्धा ठेवू शकत नाही. आपण स्वतःचा उदरनिर्वाह कसातरी करतो, पण आता त्यांच्यासाठी अन्न कुठून आणणार? राजाने पाच हत्तींऐवजी आम्हाला पाच गायी दिल्या असत्या, तर निदान त्यांच्या दुधाने तरी आमचे पोट भरले असते.

तेनालीरामाला माहित होते की त्याची पत्नी खरे बोलत आहे. थोडा विचार करून, त्याने हत्तींपासून सुटका करून घेण्याची एक योजना आखली. तो उठून म्हणाला, मी लवकरच परत येईन. आधी, मी हे हत्ती देवी कालीला समर्पित करतो. तेनालीराम हत्तींना काली मंदिरात घेऊन गेला आणि त्यांच्या कपाळावर टिळा लावला. यानंतर, त्याने हत्तींना शहरात फिरण्यासाठी सोडून दिले. काही दयाळू लोक हत्तींना खाऊ घालत, पण बहुतेक वेळा हत्ती उपाशीच राहत. लवकरच, ते अशक्त झाले.

कोणीतरी राजाला हत्तींच्या दुर्दशेबद्दल सांगितले. तेनालीरामच्या हत्तींसोबतच्या वागणुकीमुळे राजा नाराज झाला. त्याने तेनालीरामला दरबारात बोलावले आणि विचारले, तेनाली, तू हत्तींसोबत असे का वागलास?

तेनालीराम म्हणाले, महाराज, तुम्ही मला पाच हत्ती भेट दिले होते. त्यांना नाकारणे हा तुमचा अपमान ठरला असता. असा विचार करून मी ते स्वीकारले. पण ही भेट माझ्यावर ओझे बनली. मी गरीब असल्यामुळे, पाच हत्तींची काळजी घेण्याचे अतिरिक्त ओझे मला सहन झाले नाही, म्हणून मी ते देवी कालीला समर्पित केले. आता मला सांगा, जर तुम्ही मला पाच हत्तींऐवजी पाच गायी भेट दिल्या असत्या, तर त्या माझ्या कुटुंबासाठी अधिक उपयुक्त ठरल्या असत्या.

राजाला आपली चूक लक्षात आली आणि तो म्हणाला, जर मी तुला गायी दिल्या असत्या, तर तू त्यांच्याशी असेच वागला असतास का?

नाही महाराज! गायीचे दूध माझ्या मुलांच्या संगोपनासाठी उपयोगी पडले असते. उलट, त्यांनी यासाठी तुमचे आभार मानले असते आणि तुमच्या या कृपेमुळे, मी किमान गायींचा खर्च तरी उचलू शकेन. राजाने तात्काळ तेनालीकडून हत्ती परत घेण्याचा आणि त्याऐवजी त्याला पाच गायी भेट देण्याचा आदेश दिला.

# जीवन का अमृत (भाग १)



जहाँ भी आप चाहें, रहें। आप नियमित रूप से, सत्गुरु में पूर्ण आस्था के साथ, भजन-सिमरन में लगे रहें और हर समय पवित्र नामों का जाप करते रहे। यह आपकी सहायता करेगा और आपके चारों ओर एक रक्षात्मक दीवार का काम करेगा।

***

३६. मुझे आपकी प्रिय बहन की मृत्यु पर दुख हुआ। वह एक प्यारी महिला थी और सत्गुरु की दया से उसका अंत शांतिपूर्वक हुआ। चिकित्सक दयालु गुरु-सत्ता द्वारा दिए गए संरक्षण को नहीं समझ सकते हैं, जो कि शिष्य को हमेशा मिलता है, जब भी वह बेहतरी के लिए परलोक प्रस्थान करता है आपके सपने में आपकी बहन का आना महत्वपूर्ण है, जिसे आप ठीक से समझ नहीं पाए। उसने चाहा कि उसकी मृत्यु से उसका बेटा व्याकुल न हो। आपका फर्ज है कि आप उसे सांत्वना दें और जब भी जरूरी हो, उसका मार्गदर्शन करें। आपको विश्वास होना चाहिए कि सत्गुरु की दया से, परलोक में आपकी बहन संतुष्ट है।

## परलोक प्रस्थान

***

३७. रूहानियत का यह विज्ञान पक्का और स्वाभाविक है और इसमें नतीजा अवश्य मिलेगा। पुराने समय में इसको अलग-अलग नामों से पुकारा जाता था। सभी पुराने संतों-सत्गुरुओं ने वही शिक्षाएँ दी, जो कि ईसामसीह ने दी थी । संसार के सभी धर्मों की शिक्षाएँ सार्वभौमिक हैं और इसका प्रमाण हर धर्मग्रंथ में मिलता है। हालाँकि सिद्धांत, पूरे या आंशिक रूप से, विभिन्न धर्मों में अलग-अलग हो सकते हैं, पर ज्योति और श्रुति के दिव्य अनुभव केवल एक जिंदा और व्यावहारिक सत्गुरु के द्वारा ही प्राप्त हो सकते हैं। इस प्राकृतिक विज्ञान का अनोखा पक्ष यह है कि साधक, अंतर में सत्गुरु के नूरी

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

सुरेश ओबेरॉय :

पण मी तर चित्रपट बघतानासुद्धा वेगवेगळ्या भावना अनुभवतो.

शिवानीदीदी :

याचाच अर्थ तुमच्या मनाचा रिमोट कंट्रोल दुसऱ्यांकडे आहे.

सुरेश ओबेरॉय : मी इतका कमकुवत आहे?

शिवानीदीदी :

आपल्यातील बहुतेक जण आज, वर्तमान परिस्थितीत कमकुवत आहेत.

सुरेश ओबेरॉय : असं वाटणं अगदी स्वाभाविक आहे. पण हा कमकुवतपणा आहे असं मला वाटत नाही.

शिवानीदीदी :

परिस्थितीच्या प्रभावातून आपल्या मनाला आपल्याला बाहेर काढता येत नसेल तर याचा अर्थ आपलं आपल्या मनावर अजिबात नियंत्रण नाही. आपण जर चित्रपट बघत असू तर पडद्यावर चालू असलेल्या भावनांपासून स्वतः च्या भावना अलिप्त ठेवण्याची शक्ती आपल्याकडे असायला हवं. आतापर्यंत आपल्या भावना ह्या चित्रपटात दाखवल्या जाणाऱ्या भावनांशी मिळत्याजुळत्या होत्या. पण हे माझं मन आहे. त्यामुळे मी हवं तेव्हा त्याला माझ्या नियंत्रणात आणू शकते.

## अलिप्त ठेवण्याची शक्ती

आपला जेव्हा आपल्या मनावरचा ताब सुटतो तेव्हा आपलं शब्दांवरचं आणि हातांवरचं नियंत्रणही सुटतं. रस्त्यांत घडणाऱ्या हिंसक घटनांची आकडेवारी पाहा. रागाच्या भरात लोक मारहाण करतात. कित्येकदा गोळ्याही घालतात. त्यानंतर, ते सगळं असंच घडून गेलं असा दावाही ते करतात.

सुरेश ओबेरॉय :

मी बघितलंय, प्रत्यक्ष मुलाखतीत, कॅमेराचा फोकस लोकांवर असतानाही ते इतके चिडतात की तिथल्या खुर्च्या-टेबल उचलून एकमेकांना मारतात.

शिवानीदीदी :

लोकांच्या दृष्टीने हे सामान्य वागणं असतं. जेव्हा आपलं मन, शब्द आणि हात आपल्या नियंत्रणाबाहेर असतात तेव्हा आपण त्याला सामान्य म्हणू शकतो का?

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

सासु : सुनबाई हात मोकळे चांगले नाही वाटत

सुन : मोबाईल चार्जिंगला लावला आहे सासूबाई

सासु : अगं येडे, बांगड्यांबद्दल बोलतेय मी...

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* कोणत्या क्षेपणास्त्राची समुद्र ते समुद्र अशी यशस्वी चाचणी केली आहे?

– ब्रह्मोस

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद - आरोग्य संवर्धन

सावधानता : शेंगदाणे पित्तकर असल्यामुळे सहसा ते भाजून किंवा उकडूनच खावेत. तसेच पित्त प्रकृतीच्या व्यक्तींनी शेंगदाण्याचा वापर कमी प्रमाणात करावा. अनेकजणांना शेंगदाण्याची ॲलर्जी असते. अशा व्यक्तींनी शेंगदाणे खाणे टाळावे. दम्याचा त्रास असणाऱ्यांनी शेंगदाणे खाणे टाळावे. जास्त प्रमाणात शेंगदाणे खाल्ल्यास जठरातील पित्त वाढून आम्लता वाढते व त्यामुळे आम्लपित्त, अपचन, छातीत व पोटात जळजळ होणे व तीव्र डोकेदुखी, मळमळ अशा स्वरूपाचा त्रास होऊ शकतो.

निरोगी आयुष्य जगण्यासाठी व रोग झालाच, तर त्याचे निवारण करण्यासाठी भाज्या एक उत्तम संरक्षक अन्न आहे. शरीराची झालेली झीज भरून काढून त्याची वाढ करण्यासाठी आवश्यक असणारे सर्व अन्न व औषधी घटक भाज्यांमध्ये असतात.

## भाजी

औषधी गुणधर्म : भाज्या या अनेक प्रकारच्या असतात. पालेभाज्या, कंदमुळे, फळभाज्या, बिया या सर्व भाज्यांमध्ये शरीरास उपयुक्त पोषक औषधी व अन्नघटक असतात. पालेभाज्यांमध्ये निरनिराळे क्षार, जीवनसत्त्वे, फायबर (चोथा) यांचे प्रमाण भरपूर असते. त्यामुळे ज्या व्यक्तींना मलावष्टंभाचा त्रास होतो, अशा व्यक्तींनी आहारामध्ये नियमित पालेभाज्यांचे सेवन करावे. यामध्ये असणाऱ्या फायबरमुळे आतड्यांची हालचाल वाढते व त्यामध्ये असणाऱ्या सारक गुणधर्मामुळे मलप्रवृत्ती साफ होते. कंदमुळामध्ये अनेक जीवनसत्त्वे असून, त्याच्या सेवनाने थकवा आलेल्या शरीरात उत्साह निर्माण होतो. फळभाज्यांमध्ये खनिजे, जीवनसत्त्वे, पाणी व तंतुमय पदार्थांचा साठा पुरेशा प्रमाणात असतो. वेगवेगळ्या बियांमध्ये प्रथिने व पिष्टमय पदार्थ विपुल प्रमाणात असतात. शरीराचे रक्षण करण्यासाठी या भाज्यांबरोबरच बटाटे, रताळी, सुरण यांसारखी मांसल मुळे, खोडे व शेंगा याही भाज्या महत्त्वाच्या असतात. या सर्व भाज्यांमधून शरीरास आवश्यक असणारी कर्बोदके विपुल प्रमाणात मिळून शरीराला उत्साह व ऊर्जा मिळते.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# स्पर्धेच्या युगात जगणाऱ्या मुलांना ताण-तणाव विरहीत जीवन जगायला शिकवा

आपला जन्म कलीयुगात झाला अस म्हणण्यापेक्षा आपला जन्म स्पर्धेच्या युगात झालाय अस म्हणणे वावगे ठरणार नाही. जन्माला आलेल्या चिमुकल्या बाळांच्या सुद्धा वेगवेगळ्या स्पर्धा होताना आपल्याला दिसत आहेत. सशक्त बुद्धीमान सुदृढ बालक स्पर्धा अशा स्पर्धे चे नियोजन अनेकजण करताना दिसतात आणि त्या स्पर्धेमधे ही चिमुकली लेकरं या स्पर्धेच्या रिंगणात उतरलेली दिसतात. दिवसेंदिवस आपण आपल्या चिमुकल्यांच बालपण खरचं हिरावून घेत आहोत. सध्याचा प्रत्येक माणूस हा आनंदी कमी पन ताणतनावात जीवन जगताना दिसून येत आहे. प्रत्येकाला कमी वयात काही ना काही व्याधी जडलेल्या दिसून येतात तर काहींना कमी वयात मधुमेह उच्चरक्तदाब हृदयविकाराच्या गोळ्या चालू आहेत. हे झाले मोठ्या माणसांच्या बाबतीत पन आपण अनेक बातम्या पाहिल्या कि प्रार्थना चालू असताना विद्यार्थी किंवा विद्यार्थीनी कोसळून मृत्यू पावली तर कुणी चक्कर येऊन कोसळून हृदयविकारामुळे मृत्यू झाला म्हणजे कमी वयात हृदयविकाराचे प्रमाण जास्त वाढत चालले आहे. याला कारणीभूत आपला आहार व्यवस्थित नाही आपण विनाकारण ताणतनाव जास्त घेतो आणि दुसऱ्याला देतो.

मैदानी खेळ तर सोडाच पन साधा व्यायाम देखील आपण करत नाही म्हणजेच काय तर आपण आळशी होत चाललो आहोत. आणि चुकीची जीवनशैली आपण अंगीकृत केलेली आहे. आगामी पिढीला आपण मोबाईल नावाची भयानक खेळणी हातात दिलेली आहे. नको त्या गोष्टी ते त्यातून आत्मसात करत आहेत शिकत आहेत. आपल्याला हे सगळं माहीत असूनदेखील आपण पालक विशेषतः आई आपल्याला लेकराने त्रास देऊ नये म्हणून ती त्याला मोबाईल देते. तिचे काम आवरेपर्यंत लेकरू रडू नये म्हणून मोबाईल त्याच्या हातात सोपवते. चिखलाचा गोळा आहे तो तुम्ही जसा घडवाल तसा तो घडेल. लेकराने जेवण करण्यास नकार दिला कि आई त्याला मोबाईल देते मग ते मूल मोबाईल पाहण्यात मग्न होते तोपर्यंत ही आधुनिक आई त्याच्या तोंडात घासावर घास भरवते आणि त्या लेकराला पन कळत नाही ते मोबाईलच्या नादात भराभर खात रहाते. अन्न ग्रहण करताना ते सात्विक असावे देवाचे नामस्मरण करावे असे पूर्वी शिकवले जायचे पन आता मोबाईल पाहता पाहता ते कसे पचते आणि त्याचा परिणाम त्या बाळाच्या शरीरावर कसा होनार देव जाणे. अनेक लहान लेकरांचे रिल्स आपण पाहतो काही रिल्समधे छोटे मुले शिव्या देताना दिसतात ज्यांना त्या शब्दांचा अर्थ माहीत नसतो पन लाइक्स मिळवण्यासाठी त्या लेकरांचा वापर अनेकजण असा चुकीचा करून घेतात.

अनेक घरांमधे आजही विशेषतः ग्रामीण भागात लहान मुलांनी शिव्या दिल्या चुकीचे शब्द वापरले की मोठी माणसं हसताना दिसून येतात. मग हीच मुले मोठी झाली कि थोरामोठ्यांचा आदर न करता टिंगलटवाळी करतात. त्यांना चांगले संस्कार द्या त्यांना चांगल्या शाळेत टाका. रिल्स बनवण्याचे रिकामटेकडे उद्योग मुलांकडून तरी करून घेऊ नका. छोटी मुले मोठ्यांच्या प्रत्येक गोष्टीचे अणुकरण करतात अनेक घरामधे नवराबायकोच्या भांडणातील शिव्या हे मुले ऐकत असतात त्यामुळे लहान मुलांसमोर शब्दप्रयोग नेहमी चांगला व्हायला हवा. त्यांच्या नाजूक मनावर परिणाम होईल अस वातावरण घरात नक्कीच नसावे. कारण हे लेकरू स्पर्धेच्या युगात जन्माला आलेले आहे त्याला त्याचे जीवन खुप ताणतनावात जगायचे आहे, अनेक परिक्षांना सामोरे जाऊन जीवनाची स्पर्धा त्याला यशस्वी जगायची आहे. मुले ऐकतच नाही अस म्हणण्यापेक्षा लहाणपणापासून त्याला चांगल्या सवयी चांगले संस्कार लावा थोरामोठ्यांचा आदर करायला शिकवा आणि विशेष म्हणजे अपमान पचवायला शिकवा, कारण हल्लीच्या मुलांना काहीच सहन होत नाही लगेच राग येतो अंगी सहनशीलता जराही राहिलेली नाही. आणि मग या रागातून शुल्लक गोष्टीवरून वादविवाद मारामाऱ्यांचे प्रमाण एवढेच नाही तर खुनापर्यंत प्रकरण जाताना आपल्या सर्वांना बातम्यांमधून आजुबाजुच्या घटनांमधून आपल्याला पहायला मिळते.

आपल्यापेक्षा आपल्या लेकरांना जास्त संघर्ष या स्पर्धेच्या युगात करायचा आहे त्यामुळे मुलांना वाढवताना घरात सशक्त संस्काराचे वातावरण ठेवा. घरातील वातावरण शांत असेल तर त्याचा अभ्यास चांगला होईल. पूर्वी शांत असायची घरातील बाई आता तू पन शांत रहायला शिक ग आधुनिक आई .... तुझ्या लेकराच्या उज्वल भविष्यासाठी मुलांच्या अनेक गोष्टी या आईवरच अवलंबून असतात. बाबा त्याच्या शिक्षणासाठी पैसा नक्कीच पुरवतील पन आधुनिक उच्चशिक्षीत आई तू तुझ्या लेकराला मोबाईलपासून दूर ठेव तू तुझ्या मुलीची सावली बनून सतत तू तिच्यासोबत रहा. मैत्रिणी तर नकोच तिला पन तू तिची खूप जवळची मैत्रीण बन जेणेकरून ती तुझ्याजवळ तिच्या मनातील गोष्टी शेअर करेल मनातील भावना व्यक्त होईल. कधी तिच्या मनात भावनांचा गुंता झाला तर तो सोडवण्यासाठी एक चांगली मैत्रीण म्हणून तू तिला नक्कीच मदत कर. बघ मग तिला कधीच बाहेरच्या मैत्रिणींची गरज पडणार नाही. बघा पटतय का मनाला ....



शब्दांकन :
**सौ. आशा सुधीर साठे,**
सैनिकपत्नी, अहिल्यानगर.
मोबा. ९६०४०५६९२८

# प्रेरणादायी अक्षरधन

## साधलिया मन साधला भगवान



मनाचा निर्धार म्हणजे तलवारीची तीक्ष्ण धार. करा एक वार, की शत्रू तत्काळ ठार. तसेच मनाच्या निर्धाराचे. अडथळे दूर होती संकटांचे. कशाला मग अपयशाचे? तळपते मग बुद्धी. हवी मात्र साधनांची शुद्धी. दारी उभ्या भग ऋद्धिसिद्धी. मग धैर्यवान म्हणून होते तुमची प्रसिद्धी.

एक वेळ पर्वत चळतील, जागा सोडून पळतील. कारण प्रलयंकारी सुसाट वाऱ्यामुळे ते भयभीत होतील. पण धैर्यवान माणसाच्या मनाचा निर्धार, कधीही व कसल्याही संकटात ढळत नाही.

एकदा मनाचा निर्धार करता आला, की तो परमोच्च पदाचा धनी झाला. परमेश्वरी सामर्थ्याचा अधिकारी बनला. भगवंत भेटला, की संशय तुटला. दैन्यदुःखाचा फेरा संपला. आता केवळ आनंद उरला.

मनावर नियंत्रण ठेवता आले, त्याला एकाग्र करणे जमले, त्याचा निर्धार करणे साधले, की भगवंत भेटला म्हणून समजावे. मन फार पराक्रमी. ज्याला ते वश झाले, त्याला जगात काय कमी ? तुटावी बंधने सारी, मनाते निर्धारी, तो जगाचा कैवारी. अन्यथा संकटे कैसी निवारी ? ज्याचे मन अधांतरी तो बुडाला दुःखसागरी.

मनातल्या सगळ्या शुभकामना सफल झाल्या. परमेश्वरानेच त्या पूर्ण केल्या आणि मग प्रत्यक्ष आपल्या पायाजवळ जागा दिली. आता काळाची भीती कुठली? केवळ आनंदाची गणती किती? मना लागली अपरिमित शांती.

मन चौखूर उधळते घोड्यालाही लाजवते. कसे आवरावे त्याला? मनाचा निर्धार केला. मग संसारातील यातनांचा सागर सहज ओलांडता आला. एकदा देवदत्त जंगलातून घरी येत होता. एका झाडाआड एक राक्षस व एक चोर आपापसात बोलत होते. देवदत्ताने ते ऐकले. चोर म्हणाला, मी देवदत्ताच्या गायी आज रात्री पळवणार.' तर राक्षस म्हणाला, देवदत्ताचं मांस खायला मिळावं म्हणूज आज रात्री मी त्याला मारणार. देवदत्ताचे मन भ्यायले, भरकटू लागले. काय करावे ते सुचेनासे झाले. तो घरी गेला. स्वस्थ बसला. भित्र्या मनाला आवर घातला. संकटाला तोंड देण्याचा निर्धार केला. एकदा निर्धार केला, की जगायला आधार सापडतोच.

रात्री राक्षस प्रथम आत आला. देवदत्ताच्या घराचे दार सताड उघडे होते. तेलाचा दिवा जळत होता. समोरच देवदत्त हसत उभा दिसला. राक्षसाने त्याला जोरदार धडक दिली. रक्तबंबाळ होऊन राक्षस खाली पडला. जिवाच्या आकांताने ओरडला. लोक जागे झाले. तिकडे चोराचे धाबे दणाणले. तो देवदत्ताच्या गायी न चोरताच धूम पळाला.

पण राक्षस रक्तबंबाळ कसा झाला? देवदत्ताने समोरच्या भिंतीवर आरसा लावून ठेवला होता. तो स्वतः दाराआड उभा होता. दिव्याच्या प्रकाशात त्याचे प्रतिबिंब राक्षसाला फसवून गेले. आरशामागे भिंतीवर मोठमोठे अणकुचीदार खिळे टोकून ठेवले होते. राक्षसाने धडक मारताच काच फुटली. खिळे राक्षसाच्या छातीत घुसले.

**- किशोर गांधी**






## घोगरगावात संत चोखामेळा यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

संत चोखामेळा यांच्या पुण्यतिथीनिमित्त घोगरगाव येथील हनुमान मंदिरात त्यांच्या प्रतिमेचे विधिवत पूजन करून अभिवादन करण्यात आले. भक्तिभाव आणि उत्साहाच्या वातावरणात हा कार्यक्रम झाला. या पुण्यतिथी कार्यक्रमाची सुरुवात शिवाजी वाबळे यांच्या प्रेरणेतून करण्यात आली असून त्यांनी दीर्घकाळापासून केलेल्या सामाजिक व धार्मिक कार्याला आता गती मिळाल्याचे यावेळी दिसून आले. ग्रामस्थ व सहकाऱ्यांच्या सक्रिय सहभागातून हा उपक्रम सातत्याने राबविला जात आहे. या प्रसंगी गावातील विद्यमान सरपंच सुजाताताई भोसले, बाळासाहेब उगले, जालिंदर उल्हारे, प्रकाश बोरुडे (सर), महेश बोरुडे, उत्तम धामणे, मिलिंद भोसले, दिगंबर लगड, संभाजी शिंदे, बाबुराव उल्हारे, भगवान उल्हारे, बाबासाहेब शेटे, आप्पासाहेब बोरुडे, तुकाराम भोसले, ज्ञानदेव भोसले, अधिक उगले, अर्जुन उगले, नसीर सय्यद, देवेंद्र शेटे, सिताराम दाते, माधव तरटे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

# समाजाच्या उद्धारासाठीचा कुलथे कुटुंबीयांचा दातृत्व भाव प्रेरक

## संजय देवळालीकर यांचे प्रतिपादन; नगर लाड सुवर्णकार समाजास २ लाख रुपयाची देणगी

नगर - आपण ज्या समाजामध्ये मोठे झालो त्याच्या उद्धारासाठी, प्रगतीसाठी पुढे आलेले लोळगे कुटुंबाच्या दातृत्वाचे दानशूर हात समाजाच्या पुढील वाटचालीस प्रेरक असल्याचे उद्गार अहिल्यानगर लाड सुवर्णकार समाजाचे अध्यक्ष संजय देवळालीकर यांनी व्यक्त केले.

सोलापूर येथील उद्योजक करण धनंजय लोळगे व कुटुंबीयांनी अहिल्यानगर लाड सुवर्णकार समाजास दोन लाख एक हजार रुपयाची देणगी दिली.

याप्रसंगी उद्योजक धनंजय व सौ. विजया लोळगे, सौ. पूजा लोळगे, रमेश अकलूजकर, पुरुषोत्तम शहाणे, लाड सुवर्णकार समाजाचे विश्वस्त शरद कुलथे, श्याम मुंडलिक, गणेश डहाळे, योगेश नागरे, प्रकाश देवळालीकर, विनोद कुलथे, सुनील देवळालीकर, सुरेश मैड उपस्थित होते. उद्योजक करण लोळगे यांनी यावेळी बोलताना समाजाच्या सामाजिक कार्यात आपला सहयोग असावा, वंचित व गरजू बंधू-भगिनींना प्रगतीच्या प्रवाहात येण्यासाठी लोळगे कुटुंबीयांनी हा सहयोग दिला आहे. भविष्यातही अशाच प्रकारे सातत्यपूर्ण सहयोग कायम राहील असे प्रतिपादन केले.

उपस्थितांचा सन्मान लाड सुवर्णकार समाजाचे वतीने करण्यात आला. यावेळी गुलाब वाफगावकर, संध्या निसळ व समाजबांधव उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरेश मैड यांनी केले. शरद कुलथे यांनी आभार मानले.



करण धनंजय लोळगे कुटुंबीयांकडून अहिल्यानगर लाड सुवर्णकार समाजास २,०१,००० रुपयांची देणगी देण्यात आली. यावेळी संजय देवळालीकर, धनंजय लोळगे, सौ. विजया लोळगे, सौ. पूजा लोळगे, रमेश अकलूजकर, पुरुषोत्तम शहाणे, शरद कुलथे, श्याम मुंडलिक, गणेश डहाळे, योगेश नागरे, प्रकाश देवळालीकर, विनोद कुलथे, सुनील देवळालीकर, सुरेश मैड, गुलाब वाफगावकर, संध्या निसळ आदी. (छाया - सुरेश मैड)

# अहिल्यानगर सन फार्मा यांची डॉ.पाऊलबुधे फार्मसीला ६० लाख रुपयांचे अत्याधुनिक संशोधन उपकरणांची भेट

नगर - अहिल्यानगर येथील सन फार्मा कंपनी ने उद्योग क्षेत्र तसेच शैक्षणिक सहकार्य अधिक मजबूत करण्याच्या तसेच औषधनिर्माण क्षेत्रातील प्रगत संशोधन व अनुभवाधारित शिक्षणाला चालना देण्याच्या उद्देशाने त्यांच्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी उपक्रमांतर्गत वसंत टेकडी येथील सेवा शिक्षण प्रसारक मंडळाच्या डॉ.एन.जे. पाऊलबुधे कॉलेज ऑफ फार्मसी या संस्थेला अत्याधुनिक संशोधन उपकरणांची देणगी स्वरूपात खास भेट दिली आहे.

या प्रसंगी संस्थेच्या वतीने कृतज्ञता व्यक्त करताना प्राचार्य डॉ.श्याम पांगा यांनी सांगितले की, सन फार्माकडून प्राप्त झालेली ही उपकरणे विद्यार्थ्यांना, संशोधकांना व प्राध्यापकांना औषधनिर्माण उद्योगात वापरल्या जाणाऱ्या आधुनिक विश्लेषणात्मक उपकरणांवर प्रत्यक्ष काम करण्याची संधी उपलब्ध करून देतील. यामुळे विद्यार्थ्यांचे व्यावहारिक ज्ञान, संशोधन कौशल्ये व उद्योगाभिमुख शिक्षण अधिक सक्षम होईल.

सन फार्माकडून देण्यात आलेल्या उपकरणांमध्ये अत्याधुनिक व आंतरराष्ट्रीय दर्जाची उपकरणे समाविष्ट असून यामध्ये पार्टिकल साईज ॲनालायझर; डिफरेंशियल स्कॅनिंग कॅलोरीमेट्री; ॲनालिटिकल ग्रेड इलेक्ट्रॉनिक वजन काटे; पीएच मीटर्स यांचा समावेश आहे.

सदर सर्व उपकरणांची मूळ किंमत अंदाजे रुपये ६० लाख असून ही उपकरणे परदेशातून आयात करण्यात आलेली आहेत.

डॉ.पांगा यांनी पुढे सांगितले की,अशा प्रकारचे उद्योग-शैक्षणिक सहकार्य विद्यार्थ्यांमधील शैक्षणिक ज्ञान व उद्योगातील प्रत्यक्ष गरजा यांमधील दरी कमी करण्यास महत्त्वपूर्ण ठरते. तसेच या उपकरणांमुळे महाविद्यालयातील संशोधन क्षमता अधिक वृद्धिंगत होऊन नाविन्यपूर्ण औषध संशोधनाला चालना मिळेल.

यावेळी महाविद्यालयाचे व्यवस्थापन संचालक साई पाऊलबुधे यांनी सन फार्माचे वरिष्ठ व्यवस्थापन व CSR टीमचे उच्च शिक्षण व वैज्ञानिक संशोधनासाठी दिलेल्या सहकार्याबद्दल आभार मानले.

यावेळी डॉ.अझदार खान, सिनियर व्हाईस प्रेसिडेंट, सन फार्मा श्रीमती कल्पना जसवाल, CEO, सन फार्म डॉ. संदीप दहिया, सिनियर मॅनेजर, सन फार्मा श्रीनिवास न्यालपल्ली, असिस्टंट मॅनेजर (HR) व सन फार्माचे स्थानिक प्रतिनिधी उपस्थित होते

यावेळी डॉ.वेणू कोला (प्रमुख, फार्माकोलॉजी विभाग व पीजी समन्वयक), डॉ.अनुराधा चव्हाण (प्रमुख, फार्माकोग्नोसी विभाग), डॉ.रोशनी सूर्यवंशी (प्रमुख, फार्मास्युटिकल केमिस्ट्री विभाग), सौ.स्वाती कडनोर (वरिष्ठ ग्रंथपाल व प्रमुख अशैक्षणिक विभाग) दुर्गेश पवळे तसेच इतर प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांनी सन फार्माने शैक्षणिक उत्कृष्टता व संशोधन पायाभूत सुविधा विकासासाठी घेतलेल्या या उपक्रमाचे कौतुक केले.

सन फार्माचे CSR उपक्रम हे आरोग्यसेवा, शिक्षण, वैज्ञानिक संशोधन व समाजविकास या क्षेत्रांवर केंद्रित असून देशभरात विविध सामाजिक प्रकल्प राबविले जातात.



डॉ.पाऊलबुधे फार्मसी कॉलेजला सन फार्मा कंपनीकडून ६० लाख रुपयांचे अत्याधुनिक उपकरणांची भेट देण्यात आले. यावेळी संस्थेचे व्यवस्थापन संचालक साई पाऊलबुधे, प्राचार्य डॉ. श्याम पांगा, डॉ.अनुराधा चव्हाण, डॉ.रोशनी सूर्यवंशी, स्वाती कडनोर, दुर्गेश पवळे आदी (छाया - विजय मते)

# पी.ए.इनामदार ज्युनिअर कॉलेजचा बारावी बोर्ड परिक्षेत उत्कृष्ट निकाल

## विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांची उल्लेखनीय कामगिरी; उम्मे अम्मारा शेख प्रथम

नगर - मुकुंदनगर येथील यस इंडिया फाऊंडेशन संचलित पी.ए. इनामदार इंग्लिश मिडीयम स्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेजने इयत्ता बारावी विज्ञान शाखेच्या एचएससी बोर्ड परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे.



उम्मे अम्मारा अल्ताफ शेख आफरीन फिरोजोद्दीन मुल्ला आमेना कदीर शेख

यावर्षीच्या बारावी विज्ञान शाखेच्या निकालात विद्यार्थ्यांनी उत्तम यश मिळवले. कॉलेजच्या गुणवत्ता यादीत उम्मे अम्मारा अल्ताफ शेख हिने ७६ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. आफरीन फिरोजोद्दीन मुल्ला हिने ६१.८३ टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळवला, तर आमेना कदीर शेख हिने ६०.१७ टक्के गुण प्राप्त करत तृतीय क्रमांकावर स्थान मिळवले.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल कॉलेजमध्ये गुणवंतांचा सत्कार करण्यात आला. प्राचार्य युनूस सलीम, डारेक्टर शब्बीर मोहंमद सी. तसेच उपप्राचार्या फरहाना शेख यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

संस्थेचे चेअरमन अब्दुल रहिम खोकर, व्हाईस चेअरमन इंजि. इकबाल सय्यद, सचिव विकार काझी आणि अॅकॅडमिक चेअरमन तथा खजिनदार डॉ. खालिद शेख यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे तसेच त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांनी केलेल्या मेहनतीमुळे संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्तेत आणखी भर पडल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. कॉलेजमधील शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वर्षभर दिलेले शैक्षणिक मार्गदर्शन, नियमित सराव परीक्षा, अभ्यासातील सातत्य आणि पालकांचे सहकार्य यामुळे हे यश शक्य झाल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

# सविता रमेश फिरोदिया प्रशाला, नगरचा विद्यार्थी सम्राट दहीहांडे गणित-इंग्रजी परीक्षेत राज्यात द्वितीय

## राजनंदिनी गायकवाडची नवोदय परीक्षेत निवड



नगर - शिशु संगोपन संस्था संचालित सविता रमेश फिरोदिया प्रशालेने शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत दुहेरी यश संपादन केले आहे. भारती विद्यापीठातर्फे फेब्रुवारी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या गणित व इंग्रजी बहिस्थ परीक्षेत प्रशालेतील इयत्ता चौथीचा विद्यार्थी कुमार सम्राट गणेश दहीहांडे याने गणित परिचय परीक्षेत राज्यात द्वितीय क्रमांक मिळवून उज्वल यश संपादन केले. त्याला रु. ७०० चे पारितोषिक जाहीर करण्यात आले आहे. त्यास प्रशालेच्या शिक्षिका मनीषा कार्ले यांनी मार्गदर्शन केले याचबरोबर, इयत्ता पाचवीच्या जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत प्रशालेतील कु. राजनंदिनी सागर गायकवाड हिची निवड झाली आहे.

या परीक्षेसाठी विद्यार्थिनीला भाऊसाहेब डोळस, रोहिणी कुलट, प्रतिभा गर्जे, निर्मला जगताप, अनिता बेरड, श्रीराम खाडे आणि निलेश आंबेकर आदीसह मुख्याध्यापक योगिता गांधी यांनी मार्गदर्शन केले.

या यशाबद्दल शिशु संगोपन संस्थेचे चेअरमन दिलीप गुंदेचा, व्हा. चेअरमन दशरथ खोसे, सेक्रेटरी र.धों. कासवा, सहसेक्रेटरी राजेश झालानी, खजिनदार ॲड. विजय मुनोत तसेच सर्व विश्वस्त, पदाधिकारी, मुख्याध्यापिका सौ. योगिता गांधी, शिक्षकवृंद आणि पालकांनी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.



चेन्नई येथील ईसीएमएस या संस्थेने आयोजित केलेल्या अबॅकस ऑफलाइन इंटरनॅशनल कॉम्पिटिशनमध्ये नगरमधील अमेझिंग अबॅकसच्या राज्यभरातील २० शाखांमधील १३० विद्यार्थी सहभागी झाले होते.

# इंटरनॅशनल अबॅकस कॉम्पिटिशनमध्ये 'अमेझिंग'च्या १३० विद्यार्थ्यांचा सहभाग

नगर - चेन्नई येथील ईसीएमएस या संस्थेने आयोजित केलेल्या अबॅकस ऑफलाइन इंटरनॅशनल कॉम्पिटिशनमध्ये नगरमधील अमेझिंग अबॅकसच्या राज्यभरातील २० शाखांमधील १३० विद्यार्थी सहभागी झाले होते. पाईपलाईन रोडवरील श्रीकृष्ण हॉल येथे झालेल्या या स्पर्धेत अमेझिंगच्या नगरमधील शाखांसह मुंबई, नागपूर, पुणे, सिल्लोड, आळंदी, बुर्हाणनगर आदी शाखांचे विद्यार्थी सहभागी झाले होते.

या इंटरनॅशनल ऑफलाइन स्पर्धेत अमेझिंग अबॅकसच्या विद्यार्थ्यांनी उत्साहात सहभाग नोंदविला. स्पर्धेच्या नियोजनासाठी अमेझिंग अबॅकसचे संचालक किरण बल्लाळ आणि संचालिका अश्विनी बल्लाळ यांच्यासह शिक्षिका प्रज्ञा विभूती, डिंपल शर्मा, जयश्री कांबळे, शिल्पा निर्मळ, श्रद्धा देशमुख, कांचन दंडाळे यांनी परिश्रम घेतले.

अबॅकस ही मानसिक गणना आणि समस्या सोडवण्याची क्षमता वाढवण्याची एक पारंपारिक पद्धत आहे. विद्यार्थ्यांची एकाग्रता बौद्धिक क्षमतावृद्धीबरोबरच जलद व अचूक गणना करण्यासाठी अबॅकस महत्त्वाचे साधन ठरले आहे. हे महत्त्व ओळखून अमेझिंग अबॅकसने राज्यभरात २० शाखा स्थापन केल्या आहेत. त्याचा उपयोग विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीसाठी होत आहे, असे संचालिका अश्विनी बल्लाळ यांनी सांगितले.

# अ‍ॅलेक्स कप फुटबॉल स्पर्धेत गुलमोहर स्पोर्टस क्लब व फिरोदिया शिवाजीयन्स युनायटेडची विजयी आगेकूच

**भुईकोट किल्ला मैदानावर फुटबॉलचा थरार; रंगतदार सामन्यांनी प्रेक्षक मंत्रमुग्ध**



नगर – शहरातील ऐतिहासिक भुईकोट किल्ल्याच्या मैदानावर सुरू असलेल्या अ‍ॅलेक्स कपच्या ८ व्या पर्वातील फुटबॉल स्पर्धेला क्रीडाप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत असून, दररोज रंगणाऱ्या चुरशीच्या सामन्यांमुळे स्पर्धेचा थरार अधिकच वाढत आहे. ६ मे झालेल्या दोन सामन्यांमध्ये गुलमोहर स्पोर्टस क्लब आणि फिरोदिया शिवाजीयन्स युनायटेड या संघांनी विजय मिळवत पुढील फेरीकडे दमदार वाटचाल केली.

स्पर्धेतील गुलमोहर स्पोर्टस क्लब विरुद्ध बाटा फुटबॉल क्लब यांच्यातील सामना विशेष लक्षवेधी ठरला. सुरुवातीपासून दोन्ही संघांनी आक्रमक खेळ केले. सामन्याच्या १३ व्या मिनिटाला बाटा फुटबॉल क्लबच्या कामरान रंगरेज याने गोल करत संघाचे खाते उघडले आणि संघाला १–० अशी आघाडी मिळवून दिली. या गोलनंतर बाटा एफ.सी.चा आत्मविश्वास उंचावला होता.

मात्र पिछाडीवर पडल्यानंतर गुलमोहर स्पोर्टस क्लबने अधिक आक्रमक आणि संयमी खेळ करत पुनरागमन केले. संघाच्या प्रणव पंडित याने १७ व्या मिनिटाला अचूक गोल करत सामना १–१ असा बरोबरीत आणला. त्यानंतर दोन्ही संघांमध्ये चेंडूवर नियंत्रण मिळवण्यासाठी जोरदार संघर्ष पाहायला मिळाला. सामन्याच्या २७ व्या मिनिटाला आदित्य गुगळे याने अप्रतिम गोल करत गुलमोहर एस.सी.ला २–१ अशी आघाडी मिळवून दिली. अखेरपर्यंत ही आघाडी कायम राखण्यात संघाला यश आले आणि गुलमोहर स्पोर्टस क्लबने विजयाची नोंद केली.

दुसऱ्या सामन्यात फिरोदिया शिवाजीयन्स युनायटेड आणि फ्रेंडस मातोश्री फुटबॉल क्लब यांच्यात अत्यंत चुरशीची लढत पाहायला मिळाली. दोन्ही संघांनी सुरुवातीपासून आक्रमक खेळाचे प्रदर्शन करत गोल करण्यासाठी अनेक संधी निर्माण केल्या. सामन्याच्या २६ व्या मिनिटाला भानुदास चंद याने अचूक गोल करत फिरोदिया शिवाजीयन्स युनायटेडला १–० अशी आघाडी मिळवून दिली.

हा गोल सामन्यात निर्णायक ठरला. त्यानंतर फ्रेंडस मातोश्री एफ.सी. संघाने बरोबरी साधण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. मात्र फिरोदिया शिवाजीयन्स युनायटेडच्या भक्कम बचावफळीपुढे त्यांचे सर्व प्रयत्न निष्फळ ठरले. शेवटच्या क्षणापर्यंत सामना रंगतदार अवस्थेत राहिला आणि प्रेक्षकांनी प्रत्येक क्षणाचा उत्साहाने आनंद घेतला. स्पर्धेतील वेगवान खेळ, उत्कृष्ट पासिंग, बचावातील शिस्त आणि आक्रमणातील धार यामुळे मैदानावर रोमांचक वातावरण निर्माण झाले होते.

# अधिकमासानिमित्त नगर येथून ‘पुरुषोत्तमपुरी येथे दर्शन यात्रा’


नगर– अधिकमासाच्या पवित्र निमित्ताने १८ मे रोजी अहिल्यानगर हुन एसी बसने बीड जिल्ह्यातील माजलगाव तालुक्यातील पुरुषोत्तमपुरी येथे देशातील एकमेव भगवान पुरुषोत्तम मंदिराच्या दर्शन यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.

पुरुषोत्तमपुरी हे गाव भगवान पुरुषोत्तमाच्या एकमेव मंदिरासाठी संपूर्ण भारतात प्रसिद्ध आहे. अधिकमास, ज्याला धोंड्याचा महिना किंवा मलमास असेही म्हटले जाते, हा धार्मिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. धोडेमहात्म्य या पवित्र ग्रंथानुसार वर्षातील बारा महिन्यांना बारा वेगवेगळे स्वामी असतात. मात्र अधिकमासाचे स्वामीत्व कोणी स्वीकारले नाही, तेव्हा भगवान पुरुषोत्तम यांनी या महिन्याचे स्वामीत्व स्वीकारले, अशी धार्मिक कथा सांगितली जाते.

पुरुषोत्तमपुरी गावाच्या दक्षिणेकडे वाहणाऱ्या गोदावरी नदीला ‘चक्रतीर्थ’ म्हणून ओळखले जाते. या ठिकाणाची एक पौराणिक आख्यायिका देखील प्रसिद्ध आहे. पूर्वी शार्दुल नावाचा राक्षस पंचक्रोशीतील जनतेला त्रास देत होता. त्याचा नाश करण्यासाठी भगवान पुरुषोत्तम यांनी अवतार घेतला आणि सुदर्शन चक्राच्या साहाय्याने त्या राक्षसाचा वध केला. त्यानंतर ते सुदर्शन चक्र गोदावरी नदीत जाऊन पडले, अशी मान्यता आहे. हे मंदिर १३ व्या शतकातील हेमाडपंथी स्थापत्यशैलीत बांधलेले असून धार्मिक पर्यटनासाठी एक प्रमुख आकर्षण ठरले आहे. दर तीन वर्षांनी येणाऱ्या अधिकमासादरम्यान येथे मोठी यात्रा भरते आणि लाखो भाविक दर्शनासाठी गर्दी करतात.

या यात्रेत पुरुषोत्तमपुरी मंदिराबरोबरच वृद्धेश्वर मंदिर तसेच भातोडी पारगाव येथील श्री नृसिंह मंदिराचेही दर्शन घडविण्यात येणार आहे. भाविकांना उन्हाचा त्रास होऊ नये यासाठी एसी बसद्वारे प्रवासाची सोय करण्यात आली आहे.

अधिक माहितीसाठी अभिजीत पोळ (मो. ९४२२२२७९०६) आणि नंदकुमार पोळ (मो. ७८७५५०००५६) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.




सुधीर दत्तात्रय फडके लिखित ‘सर्वोपरि परात्परतत्त्व शिव’ या ग्रंथाचे प्रकाशन करताना शेखर गाडगे आदी.

# ‘सर्वोपरि परात्परतत्त्व शिव’ ग्रंथाचे अहिल्यानगरमध्ये प्रकाशन

नगर – लेखक सुधीर दत्तात्रय फडके लिखित ‘सर्वोपरि परात्परतत्त्व शिव’ या ग्रंथाचा प्रकाशन सोहळा अहिल्यानगर येथील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात झाला. शिवतत्त्वाचे गूढ, परात्पर स्वरूप आणि सनातन धर्मातील त्यांचे सर्वोच्च स्थान अभ्यासपूर्ण, शास्त्रोक्त आणि सुलभ भाषेत मांडणारा हा ग्रंथ सध्या शिवभक्त आणि अध्यात्मप्रेमींमध्ये आकर्षणाचा विषय ठरत आहे. कार्यक्रमाची सुरुवात भगवान महादेवाच्या प्रतिमेचे पूजन, वैदिक मंत्रोच्चार आणि दीपप्रज्वलनाने झाली. या सोहळ्याचे प्रमुख पाहुणे म्हणून शिवमहापुराण कथाकार तसेच रामकृष्ण मठ (बेलूर) येथील उपाध्यक्ष गहनानंद महाराज यांचे शिष्य शेखर गाडगे (बाळ गाडगे, नागपूर) उपस्थित होते. त्यांच्या हस्ते ग्रंथाचे लोकार्पण करण्यात आले.

मार्गदर्शन करताना शेखर गाडगे म्हणाले, भगवान शिव हे केवळ देवता नसून ते संपूर्ण सृष्टीचे सर्वोच्च परात्पर तत्त्व आहेत. आधुनिक पिढीला शास्त्रोक्त अध्यात्म समजावून सांगणारा आणि भक्तीला ज्ञानाची जोड देणारा हा ग्रंथ प्रत्येक घरात असायलाच हवा.

या सोहळ्यास वेदमूर्ती सिद्धेश्वर निसळ गुरुजी, प्रवचनकार ज्ञानकुमार झंवर, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष के. डी. खानदेशी आदी उपस्थित होते. संपूर्ण परिसर हर हर महादेवच्या जयघोषाने भक्तिमय झाला होता.

सुधीर फडके यांनी सांगितले की, अनेक वर्षांच्या अभ्यास, चिंतन आणि शास्त्राधारित संशोधनातून या ग्रंथाची निर्मिती करण्यात आली आहे. शिवतत्त्व सर्वसामान्य भक्तांपर्यंत सोप्या आणि प्रमाणभूत स्वरूपात पोहोचावे, हा या ग्रंथामागील मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या ग्रंथाच्या राज्यव्यापी प्रसारासाठी पुस्तक विक्रेते, वितरक, धार्मिक संस्था, मंदिर ट्रस्ट, सत्संग मंडळे आणि अध्यात्म प्रेमींना विशेष आवाहन करण्यात आले आहे. धार्मिक साहित्याला वाढती मागणी लक्षात घेता विक्रेत्यांसाठी आकर्षक कमिशन योजना जाहीर करण्यात आली असून विक्रीसाठी विशेष सवलती देण्यात येणार आहेत. विक्रेत्यांना पुस्तके विकण्यासाठी एक महिन्याचा कालावधी दिला जाणार असून विक्रीनंतर कमिशनची रक्कम स्वतः कडे ठेवून उर्वरित रक्कम जमा करण्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे. व्यवहारातील विश्वास आणि पारदर्शकतेसाठी अधिकृत लेखी पत्र देण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. माहिती व बुकिंगसाठी –९६०४३०१४२०,७५७४८४२७८.

# ‘मानद वन्यजीव रक्षक’पदी भारती शेवते यांची नियुक्ती



महाराष्ट्र शासनाने अहिल्यानगर जिल्ह्यासाठी ‘मानद वन्यजीव रक्षक’म्हणून भारती अनिल शेवते यांना अधिकृत नियुक्ती दिल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना उपवनसंरक्षक सौ. अश्विनी दिघे आदी.

नगर – महाराष्ट्र शासनाने अहिल्यानगर जिल्ह्यासाठी ‘मानद वन्यजीव रक्षक’म्हणून भारती अनिल शेवते यांना अधिकृत नियुक्ती दिली आहे. विशेष म्हणजे, या जबाबदारीवर नियुक्त होणाऱ्या त्या जिल्ह्यातील पहिल्या महिला ठरल्या आहे. वनविभाग कार्यालयात आयोजित विशेष कार्यक्रमात उपवनसंरक्षक सौ. अश्विनी दिघे यांच्या हस्ते भारती शेवते यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी वनपरिक्षेत्र अधिकारी तेलोरे, शिरसाठ, वनविभागाचे अधिकारी–कर्मचारी, तसेच निसर्ग भ्रमंती ग्रुपचे विद्यासागर पेटकर आणि निसर्गप्रेमी उपस्थित होते.

जखमी वन्यजीवांचे रेस्क्यू, शिकारींवर नजर, वन्यजीव गुन्ह्यांची माहिती प्रशासनापर्यंत पोहोचवणे, तसेच नागरिकांमध्ये जनजागृती निर्माण करणे या क्षेत्रात भारती शेवते गेल्या अनेक वर्षांपासून सक्रियपणे कार्यरत आहेत. त्यांच्या या धाडसी आणि सातत्यपूर्ण कार्याची दखल घेत शासनाने त्यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपवली आहे.

भारतातील वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ (Wildlife Protection Act 1972) अंतर्गत वन्यजीवांची शिकार, तस्करी, अवैध व्यापार आणि अधिवास नष्ट करणे हा गंभीर गुन्हा मानला जातो. या कायद्यांतर्गत दोषींवर दंड आणि कारावासाची तरतूद असून, वनविभागासोबत समन्वय साधून मानद वन्यजीव रक्षकांना देखील संरक्षण आणि जनजागृतीच्या कामात महत्त्वाची भूमिका बजावता येते.

भारती शेवते म्हणाल्या हा सन्मान माझा नसून जंगलातील त्या मूक प्राण्यांचा आहे, ज्यांच्या संरक्षणासाठी मी आयुष्यभर काम करत राहणार आहे.

# माहेश्वरी प्रीमियर लीग उत्साहात; सर्व गटांतील स्पर्धांना प्रतिसाद

नगर – श्री माहेश्वरी युवक मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेली माहेश्वरी प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धा उत्साहात पार पडली. या स्पर्धेत महिला, पुरुष तसेच बालकांनी सहभाग नोंदवत विविध गटांमध्ये सामने खेळले. संपूर्ण स्पर्धेदरम्यान क्रीडाप्रेमींचा प्रतिसाद लाभला असून मैदानावर खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी सादर केली.

महिला क्रिकेट टर्फ लीगमध्ये झंवर स्ट्रायकर्स संघाने विजेतेपद पटकावले, तर आस्था व्हिजन वॉरियर्स संघ उपविजेता ठरला. महिला खेळाडूंनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत प्रेक्षकांची मने जिंकली.

किड्स टर्फ क्रिकेट लीगमध्ये अट्टल स्माईल स्मॅशर्स संघ विजेता ठरला, तर मालू ब्रो ब्लास्टर्स संघाने उपविजेतेपद मिळवले. लहानग्या खेळाडूंनी दाखवलेला आत्मविश्वास आणि जिद्द सर्वांसाठी प्रेरणादायी ठरली.

पुरुष क्रिकेट लीगमध्ये एपिटोम एंटरटेनर्स संघाने विजेतेपद मिळवले, तर वैष्णवी रायझर्स संघ उपविजेता आणि भिंगारवाला ब्लास्टर्स संघ द्वितीय उपविजेता ठरला. या गटातील सामने विशेषतः रोमांचक ठरले. सर्वोत्कृष्ट फलंदाज म्हणून निलेश मंत्री, सर्वोत्कृष्ट गोलंदाज म्हणून योगेश बजाज, सर्वोत्कृष्ट क्षेत्ररक्षक म्हणून वेदांत बजाज आणि मालिकवीर म्हणून ऋषी चांडक यांचा गौरव करण्यात आला.




श्री माहेश्वरी युवक मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेली माहेश्वरी प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धा उत्साहात पार पडली.

श्री माहेश्वरी युवक मंडळाचे अध्यक्ष अमित खटोड यांच्या नेतृत्वाखाली या माहेश्वरी प्रीमियर लीगचे उत्कृष्ट नियोजन करण्यात आले होते. ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी पवन बंग, सी. ए. मनीष नावंदर, प्रतीक सारडा, शाम भुतडा, विशाल झंवर, सुमित चांडक, गोविंदा जाखोटिया, संकेत मानधणे, सी. ए. अनिकेत बलदवा, गोविंद दरक, सुमित बिहाणी, सिद्धार्थ झंवर, संकेत अट्टल, आदित्य काकाणी, सी. ए. प्रणव बिहाणी, यश खटोड आणि ऋषि बजाज आदींनी परिश्रम घेतले.

किड्स व महिला क्रिकेट टीम मालकांमध्ये मालू ब्रो ब्लास्टर्स – गोपाल मालू, सोहम फायटर्स – पवन झंवर, अट्टल्स स्माइल स्मॅशर्स – डॉ. प्रतीक अट्टल, गजमुख रॉयल्स – गोपेश नागोरी, लड्ढाज सुपर स्टार – अमित लड्ढा, झंवर स्ट्रायकर्स – रुपेश झंवर, आस्था व्हिजन वॉरियर्स – डॉ. गणेश सारडा, बी स्क्वेअर चॅलेंजर्स – सीए अक्षय बिहानी यांचा समावेश होता.

MPL टीम मालकांमध्ये एपिटोम एंटरटेनर्स – अनुराग धूत, फोर्स पुगालिया – संजय पुगालिया, देवास टायगर – पवन धूत, आरएसपीएल – राघवेंद्र बिहानी, सुमेरू स्मॅशर्स – श्रीगोपाल जाखोटिया, आयडियल स्टार्स – महेश इंदानी, मानधाना रॉयल्स – पराग मानधाना, भिंगारवाला ब्लास्टर्स – कमले झंवर, वैष्णवी रायझर्स – नितीन बजाज, अव्हेन्यू वॉरियर्स – आनंद लाहोटी यांनी सहभाग घेतला. स्पर्धेसाठी विविध प्रायोजकांनी सहकार्य केले.

या प्रसंगी अध्यक्ष अमित खटोड यांनी आपल्या भाषणात सांगितले की, माहेश्वरी प्रीमियर लीग हा केवळ क्रिकेटचा सामना नसून समाजाला एकत्र आणणारा एक मोठा उत्सव आहे. महिला, पुरुष आणि लहानग्यांचा उत्स्फूर्त सहभाग हीच या उपक्रमाची खरी ताकद असून यामुळे समाजात एकोपा, मैत्री आणि क्रीडाभावना वृद्धिंगत होते. अशा उपक्रमांमुळे नव्या पिढीला व्यासपीठ मिळते, त्यांच्यातील कौशल्य विकसित होते आणि समाजातील सर्व घटकांमध्ये संवाद वाढतो. पुढील काळातही अशा स्पर्धा अधिक भव्य स्वरूपात आयोजित करण्याचा मानस असून सर्वांनी यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

प्रोजेक्ट चेअरमन म्हणून अभिनंदन कलानी, गोविंदा काकाणी, वेदांत बजाज आणि भूषण काबरा यांनी विशेष परिश्रम घेतले. सूत्रसंचालनाची जबाबदारी मधुर बिहाणी यांनी समर्थपणे पार पाडली, तर आभार प्रदर्शन पियुष झंवर यांनी केले.



विचार भारतीच्या ग.म.मुळे व्याख्यानमालेची प्रचारपत्रिका ग्रामदैवत श्री विशाल गणपती मंदिराला अर्पण करण्यात आली.

# ‘विचार भारती’तर्फे २४ ते २८ मे दरम्यान ग.म.मुळे स्मृती व्याख्यानमालेचे आयोजन

नगर – विचार भारतीच्या वतीने सालाबादप्रमाणे अहिल्यानगरमध्ये ग.म.मुळे स्मृती व्याख्यानमालेचे आयोजन केले आहे. २४ ते २८ मे या दरम्यान सावेडीच्या माऊली सभागृहात दररोज सायंकाळी ६:३० ते ८:३० या वेळेत ही व्याख्यानमाला होणार आहे. या व्याख्यानमालेची प्रचार पत्रिका ग्रामदैवत श्री विशाल गणपतीला अर्पण करून वाटपाचा शुभारंभ करण्यात झाला, अशी माहिती व्याख्यानमाला प्रमुख प्रशांत आढाव यांनी दिली.

या कार्यक्रमास मार्गदर्शक राजाभाऊ मुळे, सचिव सुधीर लांडगे, अनिल मोहिते, प्रशांत आढाव, अशोकराव गायकवाड, श्रीगोपाल जाखोटिया, राजेश झंवर, डॉ.नीलकंठ ठाकरे, माळीवाडा गणपती देवस्थानचे पंडितराव खरपुडे, यश निंबाळकर, सुनील नागोरी, मनोज झंवर, डॉ. विलास जाधव आदी उपस्थित होते.

अशोक गायकवाड म्हणाले, विचार भारतीच्या वतीने वर्षभर सामाजिक, सांस्कृतिक, प्रबोधनात्मक तसेच गणपती देखावा स्पर्धा व नवरात्रोत्सवात महिला जागृती अशा विविध उपक्रमांचे आयोजन करत आहे. यामधील प्रबोधनात्मक व्याख्यानमाला हा सर्वात महत्वाचा उपक्रम असून याद्वारे देशातील नावाजलेल्या वक्त्यांना ऐकण्याची सुवर्णसंधी नगरकरांना उपलब्ध होते. देशातील ज्वलंत घटना व प्रश्नांवर जनजागृती याद्वारे होते. यंदाही अनेक दिग्गज वक्त्यांना पाचारण करण्यात आले आहे. या सर्व उपक्रमांचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

# सावेडीतील महापौर उद्यानात बालगोपालांचा उत्साह ओसंडला; खेळ, संस्कार आणि आनंदाची पर्वणी; पालकांकडून कौतुक





माजी महापौर बाबासाहेब वाकळे यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या समर कॅम्पला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद मिळत आहे. (छाया – लहू दळवी)

नगर – सावेडी गावातील महापौर उद्यान परिसर सध्या बालगोपालांच्या आनंदाने आणि उत्साहाने फुलून गेला असून माजी महापौर बाबासाहेब वाकळे यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या समर कॅम्पला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद मिळत आहे. उन्हाळ्यातील शालेय सुट्टीत मुलांनी मोबाईल आणि टीव्हीपासून दूर जात मैदानी खेळ, संस्कार आणि विविध कला उपक्रमांकडे वळावे या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या समर कॅम्पमध्ये शेकडो विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आहे.

महापौर उद्यानात सायंकाळ पासूनच बालगोपाळांचा जल्लोष पाहायला मिळत असून विविध खेळ, व्यायाम, योगा, सांस्कृतिक उपक्रम आणि मनोरंजनात्मक स्पर्धांमुळे संपूर्ण परिसर आनंदमय वातावरणाने भारावून गेला आहे. बालकांनी क्रिकेट, कबड्डी, दोरीखेच, लाठीकाठी, जिम्नॅस्टिक, सेल्फ डिफेन्स, एरोबिक्स, योगा अशा विविध खेळांचा मनमुराद आनंद घेतला.

यावेळी बाबासाहेब वाकळे यांनीही बालगोपाळांमध्ये मिसळत खेळांचा आनंद घेतला आणि स्वतःच्या बालपणीच्या आठवणींना उजाळा दिला. मुलांच्या उत्साहामुळे संपूर्ण महापौर उद्यान गजबजून गेले होते. पालकांनीही या उपक्रमाचे मनापासून कौतुक करत अशा

**समर कॅम्पमध्ये शेकडो विद्यार्थ्यांचा सहभाग**

संस्कारक्षम आणि आरोग्यवर्धक उपक्रमांची आजच्या काळात मोठी गरज असल्याची भावना व्यक्त केली.

यावेळी बाबासाहेब वाकळे म्हणाले की, आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात मुले मोबाईल, व्हिडिओ गेम आणि टीव्हीमध्ये अडकून पडत आहेत. त्यामुळे त्यांचे बालपण हरवत चालले असून मैदानी खेळांपासून ते दूर जात आहेत. यामुळे शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे. मुलांनी निरोगी, सुदृढ आणि आत्मविश्वासपूर्ण जीवन जगायचे असेल तर त्यांना बालवयातच मैदानी खेळांची आवड निर्माण होणे अत्यंत गरजेचे आहे. म्हणूनच या समर कॅम्पच्या माध्यमातून खेळ, संस्कार, कला आणि संस्कृती यांचा सुंदर संगम घडवण्याचा प्रयत्न केला आहे.

ते पुढे म्हणाले की, आजचे विद्यार्थी हे उद्याच्या भारताचे भविष्य आहेत. मुलांमध्ये नेतृत्वगुण, संघभावना, शिस्त, आत्मविश्वास आणि सकारात्मक विचार निर्माण व्हावेत यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता आहे. खेळामुळे केवळ शरीर मजबूत होत नाही, तर मन देखील सक्षम बनते. छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास, जिजाऊंचे संस्कार आणि आपल्या संस्कृतीची ओळख मुलांना या शिबिरातून करून दिली जात आहे. मुलांनी अभ्यासाबरोबरच खेळ, कला आणि सामाजिक संस्कार आत्मसात करणे काळाची गरज आहे.

समर कॅम्पमध्ये मुलांना अ‍ॅथलेटिक्स, योगा, रोप मल्लखांब, हॉर्स रायडिंग, जादू प्रयोग, सेल्फ डिफेन्स ट्रेनिंग, संस्कार वर्ग, कथाकथन, मजेदार खेळ, सहल, क्रिकेट, कबड्डी, दांडपट्टा, एरोबिक्स डान्स यांसारख्या विविध उपक्रमांचे प्रशिक्षण दिले जात आहे. तसेच जिजाऊ माता आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित ऐतिहासिक गोष्टी आणि संस्कारांचे धडेही दिले जात आहेत.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## टक्कलपणाची भीती '५३९ टक्के' संपली!



वाढत्या वयानुसार कपाळावरून मागे सरकणारी केसांची रेषा आणि मूठभर तुटणाऱ्या केसांमुळे तुम्ही त्रस्त असाल, तर ही बातमी तुमच्या चेहऱ्यावर नक्कीच हसू आणू शकते. अमेरिकेत नुकतेच टक्कल पडण्याच्या समस्येवर बनवलेल्या एका नवीन औषधाच्या क्लिनिकल चाचण्यांचे निकाल समोर आले आहेत, ज्यामुळे जगभरातील डॉक्टरांना आश्चर्याचा धक्का बसला आहे. वैज्ञानिकांचा दावा आहे की, या औषधाने केवळ केस गळणेच थांबवले नाही, तर पुरुषांमध्ये नवीन केस उगवण्यातही जबरदस्त यश मिळवले आहे.


कॉस्मो फार्मास्युटिकल्स नावाच्या कंपनीचा दावा आहे की, काही रुग्णांमध्ये या नवीन औषधाने प्लेसिबो म्हणजेच साध्या गोळ्यांच्या तुलनेत ५३९ टक्क्यांपर्यंत अधिक नवीन केस उगवले आहेत. हा आकडा स्वतःच दर्शवतो की, टक्कल पडण्याच्या उपचारात हे औषध किती शक्तिशाली असू शकते.

पुरुषांमध्ये टक्कल पडण्याचे मुख्य कारण 'डीएचटी' नावाचे हार्मोन आहे. हे हार्मोन हळूहळू केसांच्या मुळांना कमकुवत करून त्यांना पातळ करते, ज्यामुळे केस उगवणे थांबते. सध्या बाजारात मिनोक्सिडिल, फिनास्टराईड किंवा हेअर ट्रान्सप्लांट सारखे उपचार उपलब्ध आहेत; परंतु त्यांचे दुष्परिणाम होऊ शकतात आणि ते खूप महागडे देखील असतात. चर्चेत आलेल्या या नवीन औषधाचे नाव 'क्लॅस्कोटेरॉन ५ पर्सेंट' (Clascoterone 5%) आहे. हे एक असे द्रावण आहे, जे थेट डोक्याच्या त्वचेवर लावले जाते. याचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे ते शरीराच्या आत न जाता, फक्त डोक्याच्या त्वचेवरच डीएचटी हार्मोनला ब्लॉक करते. यामुळे हे औषध त्याच्या जुन्या पर्यायांपेक्षा अधिक सुरक्षित आणि शरीरासाठी सहन करण्यायोग्य मानले जात आहे.

कारण, त्याचा परिणाम हव्या त्या ठिकाणीच असतो. सुमारे १,४०० ते १,५०० पुरुषांवर केलेल्या दोन मोठ्या चाचण्यांमध्ये या औषधाने उत्कृष्ट परिणाम दाखवले आहेत. पहिल्या चाचणीत क्लॅस्कोटेरॉन वापरणाऱ्या लोकांमध्ये ५३९ टक्के आणि दुसऱ्या चाचणीत १६८ टक्के अधिक नवीन केस उगवलेले दिसून आले. कंपनीचे म्हणणे आहे की, सुरुवातीच्या टक्कल पडलेल्या अनेक पुरुषांमध्ये केस स्पष्टपणे पुन्हा दिसू लागले आहेत.

सर्वात चांगली गोष्ट म्हणजे, या औषधाचे कोणतेही मोठे दुष्परिणाम समोर आले नाहीत आणि ते पूर्णपणे सुरक्षित आढळले आहे. क्लॅस्कोटेरॉनला यापूर्वीच २०२० मध्ये मुरुमांच्या उपचारासाठी अमेरिकेच्या एफडीएने मंजुरी दिली आहे. आता कंपनी याचा १२ महिन्यांचा सुरक्षितता डेटा पूर्ण करत आहे. पुढील वर्षी अमेरिका आणि युरोपमध्ये हेअर लॉस ट्रीटमेंटसाठी याला अधिकृत मंजुरी मिळेल, अशी अपेक्षा आहे. असे झाल्यास गेल्या ३० वर्षांतील टक्कल पडण्यावरील हा पहिला नवीन आणि क्रांतिकारी उपचार असेल, जो ५० वर्षांपर्यंत टक्कल पडलेल्या कोट्यवधी पुरुषांसाठी एक नवी आशा घेऊन येईल.

## अकरा मीटर लांबीचा विक्राळ मोसासॉरस




नुकत्याच झालेल्या एका अभ्यासामध्ये मोसासॉरस या महाकाय समुद्री प्राण्याबद्दल एक अनोखा शोध समोर आला आहे, जो एकेकाळी समुद्रांवर राज्य करत होता. उत्तर डकोटा येथे, जिथे टी-रेक्सचे अवशेष आढळले आहेत, त्याच ठिकाणी मोसासॉरसचा एक दात सापडला आहे. या शोधामुळे मोसासॉरस फक्त महासागरातच राहतो या आपल्या जुन्या समजुतीला आव्हान मिळाले आहे. हा दात सूचित करतो की हे तब्बल अकरा मीटर लांबीचे विशाल जीव गोड्या पाण्याच्या भागातही राहण्यास शिकले होते.

जवळपास ६ कोटी ६० लाख वर्षांपूर्वी अस्तित्वात असलेल्या मोसासॉरससारख्या समुद्री शिकारी प्राण्यांबद्दल दीर्घकाळ असे मानले जात होते की ते केवळ मोठ्या महासागरांमध्येच राहतात. परंतु, उत्तर डकोटातील गोड्या पाण्याच्या ठिकाणी मोसासॉरसचा दात सापडल्यामुळे वैज्ञानिक आश्चर्यचकित झाले. या दाताचे आयसोटोप विश्लेषण करण्यात आले. या विश्लेषणामधून हे स्पष्ट झाले की, प्रजाती नामशेष होण्यापूर्वी आपल्या शेवटच्या काळात, मोसासॉरसने स्वतःला नद्या आणि गोड्या पाण्याच्या वातावरणात राहण्यासाठी जुळवून घेतले होते.

हा दात टी-रेक्सच्या दातांसोबत आणि मगरीच्या हाडांसोबत सापडला होता. या बदलाचे कारण त्या वेळी पृथ्वीच्या पर्यावरणात होत असलेल्या मोठ्या बदलांमध्ये दडलेले आहे. आसपासच्या ठिकाणांहून मिळालेल्या इतर मोसासॉरसच्या दातांमध्येही तसेच आयसोटोपचे संकेत आढळले आहेत. यामुळे हे निश्चित होते की मोसासॉरस त्याच्या प्रजाती नामशेष होण्यापूर्वीच्या शेवटच्या १ दशलक्ष वर्षांमध्ये (१० लाख वर्षांमध्ये) गोड्या पाण्याच्या प्रदेशात राहू लागले होते. याचा अर्थ असा होतो की, मोसासॉरस नदीच्या गोड्या पाण्याच्या वातावरणात राहात होता आणि नामशेष होण्यापूर्वी तो नद्यांमध्ये निवास करत असे.

मोसासॉरसची अंदाजित लांबी सुमारे ११ मीटर (सुमारे ३६ फूट) होती, जी सर्वात मोठ्या किलर व्हेलच्या आकाराएवढी आहे. या प्रचंड आकारामुळे, तो समुद्री आणि गोड्या पाण्याच्या दोन्ही ठिकाणी सर्वात मोठा शिकारी बनला असावा. नदीच्या प्रणालीमध्ये, तो एक असामान्य शिकारी होता.तेथे तो टी-रेक्स आणि मगरींसारख्या इतर मोठ्या प्राण्यांसोबत किंवा त्यांच्या विरुद्ध शिकार करत असेल.

## अनोखे डीएनए असलेले सांगाडे



हजारो वर्षांपूर्वी सहारा वाळवंट आजच्यासारखे कोरडे नव्हते, तर ते एक हिरवेगार आणि सुपीक क्षेत्र होते, जिथे समृद्ध समुदाय राहात होते. 'नेचर' या नियतकालिकात प्रकाशित झालेल्या एका संशोधनात या प्राचीन लोकांवर प्रकाश टाकण्यात आला आहे. तिथे असे अनोखे डीएनए असलेले सात हजार वर्षांपूर्वीचे मानवी सांगाडे सापडले आहेत.

हा अभ्यास प्रामुख्याने नैऋत्य लिबियातील ताकारकोरी रॉक शेल्टर नावाच्या ठिकाणी दफन केलेल्या दोन महिलांच्या डीएनएवर आधारित आहे. मॅक्स प्लँक इन्स्टिट्यूटमधील आनुवंशिकी शास्त्रज्ञांनी हे संशोधन केले आहे, जे उत्तर आफ्रिकेतील एका अतिशय खास प्राचीन वंशाचा शोध घेते. सुमारे ७,००० वर्षांपूर्वी सहारा वाळवंट आजच्या कोरड्या वाळवंटापेक्षा पूर्णपणे वेगळे होते. या कालावधीला 'आफ्रिकन आर्द्र काळ' म्हणतात, जेव्हा उत्तर आफ्रिकेत खूप जास्त ओलावा होता. येथे मोठी गवताळ मैदाने, तलाव आणि जंगले पसरलेली होती.

आधुनिक लिबियातील तद्रार्ट अकास पर्वतामध्ये ताकारकोरी रॉक शेल्टर नावाचे ठिकाण आहे. ताकारकोरी हे एक अत्यंत महत्त्वाचे उत्खनन केंद्र राहिले आहे, जिथे १०,००० वर्षांपेक्षा अधिक जुन्या मानवी वस्तीचे पुरावे सापडले आहेत. याच ठिकाणी दोन महिलांना दफन करण्यात आले होते, ज्यांचे अवशेष शास्त्रज्ञांना मध्य सहारातील पहिले प्राचीन मानवी डीएनए मिळवून देण्यास उपयोगी ठरले. कोरड्या वाळवंटी वातावरणामुळे या सांगाड्यांचे नैसर्गिकरित्या ममीकरण झाले होते, ज्यामुळे त्यांचा डीएनए सुरक्षित राहिला.

या संशोधनाचा सर्वात रोमांचक भाग म्हणजे उत्तर आफ्रिकेतील एका अतिशय खास प्राचीन वंशाची ओळख पटवणे. ताकारकोरीच्या महिलांचा डीएनए दर्शवतो की त्या एका प्राचीन समूहाचा भाग होत्या, ज्याचा वंश आजच्या कोणत्याही लोकसंख्येत आढळत नाही. संशोधनातून असे दिसून आले आहे की, हा वंश इतर मानवी समूहांपासून सुमारे ५०,००० वर्षांपूर्वी वेगळा झाला होता. हा शोध दर्शवतो की आधुनिक उत्तर आफ्रिकेतील लोकसंख्येची विविधता या कारणामुळे आहे, कारण त्यांच्या डीएनए मध्ये प्राचीन वंश समाविष्ट आहेत. या वंशांनी इतर समूहांशी संपर्क साधला, पण ते पूर्णपणे विलीन झाले नाहीत. यामुळे आफ्रिकेतील मानवी स्थलांतर आणि संस्कृतीच्या प्रसाराबद्दलच्या आपल्या जुन्या समजुतींना आव्हान मिळते आणि मानवी इतिहासाची एक अधिक जटिल कथा समोर येते.

**आतापर्यंत तुम्ही महामार्गांवर पांढऱ्या रंगाच्या, पिवळ्या रंगाच्या निर्देशक खुणा पाहिल्या असतील. आपल्यापैकी जवळपास सर्वांनाच थोड्या फार फरकाने या निर्देशकांचा मूळ उद्देश काय आहे, याची कल्पना असते. मात्र, आता अगदी नव्या रंगाने रस्त्यावर निर्देशक आखण्यात आले असून, हा नवा बदल काय आहे, हे समजून घेणं महत्त्वाचं आहे.**

## महामार्गांवर लाल निर्देशक कशासाठी?

नव्या निर्देशकांसाठी चक्क लाल रंग वापरण्यात आला आहे. विशेष म्हणजे इतर सामान्य निर्देशक रेषांप्रमाणे या लाल रंगाच्या रेषा नाजूक नसून मोठ मोठे पॅच मारल्याप्रमाणे हे निर्देशक आहेत. आता या लाल रंगाच्या मोठ्या पॅचसारख्या निर्देशकांचा अर्थ काय, असा प्रश्न तुम्हाला पडला असेल, तर जोपर्यंत तुम्ही मध्य प्रदेश आणि छत्तीसगडमध्ये रस्ते मार्गे प्रवास करत नाही, तोपर्यंत याचं टेन्शन घेण्याची गरज नाही. कारण, सध्या हे निर्देशक केवळ याच राज्यांमधील एका ठरावीक रस्त्यासाठी प्रायोगिक तत्त्वावर वापरण्यात येत आहेत; पण या लाल रंगाच्या निर्देशकांचा अर्थ फारच उपयुक्त असून, लवकरच हे सर्वत्र वापरण्यास सुरुवात झाली, तर आश्चर्य वाटण्याचं कारण नाही.

हे लाल निर्देशक ज्या मार्गावर काढले आहेत तो मार्ग आहे, जबलपूर-भोपाळ राष्ट्रीय महामार्ग! राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४५ असा या रस्त्याचा कोड आहे. हा महामार्ग मध्य प्रदेश आणि छत्तीसगड राज्यांमधून जातो, ज्याची सुरुवात भोपाळजवळील ओबेदुल्लागंज येथून होते आणि जबलपूर मार्गे बिलासपूरपर्यंत पोहोचतो. या मार्गावरील घाटातील भागांमध्ये आणि वन्य क्षेत्र असलेल्या भागांमध्ये रस्त्यावर मोठमोठ्या आकाराचे लाल रंगाचे पट्टे काढण्यात आले आहेत. वन्यप्राण्यांना अपघातांपासून वाचवण्यासाठी हा महामार्ग रंगीत करण्यात आला आहे. येत्या काळात या प्रयत्नांमुळे शेकडो प्राण्यांना वाचवण्याचे उद्दिष्ट साध्य होण्याची अपेक्षा आहे.

जबलपूर आणि भोपाळ राष्ट्रीय महामार्गाचा १२ किलोमीटरचा भाग हा वन्य क्षेत्र आणि संवेदनशील वन्यजीवन असलेल्या भागातून जातो. मध्य प्रदेशातून जाताना हा महामार्ग वीरांगना दुर्गावती व्याघ्र प्रकल्पातून जातो. तो नौरादेही वन्यजीव अभयारण्यातूनही जातो. कोल्हे आणि हरीण यांसारखे प्राणी पूर्वी अनेकदा या वर्दळीच्या रस्त्यावरून जाताना दिसायचे. वाहने या मार्गावरून प्रचंड वेगाने जात असल्याने अचानक एखादा प्राणी आडवा आला, तर त्या प्राण्यांना अपघातात जीव गमवावा लागायचा. या भागात अगदी नीलगायीसारख्या मोठ्या प्राण्यांनादेखील वाहनांनी धडक दिल्याची उदाहरणे आहेत. हळूहळू हा परिसर धोकादायक क्षेत्र म्हणून ओळखला जाऊ लागला.



याच समस्येचे निराकरण करण्यासाठी भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने (एनएचएआयने) दोन किलोमीटरच्या भागात टेबलटॉप लाल बेस तयार केला. हा उंचावलेला भाग नेहमीच्या रस्त्यापेक्षा थोडा वर आहे. या रस्त्यावर रंगवलेल्या रंगीत पट्ट्या पाच मिलीमीटर जाडीच्या आहेत. त्यामुळे त्या अगदीच सहज लक्षात येतात. या खुणा दिल्यावर वेग कमी करणं अपेक्षित आहेच; पण हे रंगकाम करताना जाणूनबुजून अधिक जाडी ठेवण्यात आल्यामुळे रंगाच्या पोताने चालकांना त्यावरून गाडी चालवताना थोडासा धक्का जाणवतो. त्या छोट्या कंपनाच्या माध्यमातून चालकांना वेग कमी करण्यास सांगितले जाते. या भागात वन्यप्राण्यांचा वास असून, प्राणी जवळपासून जात असतील, असे सूचित करण्याचा हा प्रयत्न आहे.

## अग्नीतंत्रज्ञानाचा शोध निएंडरथलनी लावला?



निएंडरथल्स हे जगातील पहिले अग्नी तंत्रज्ञान शोधक होते, असा महत्त्वपूर्ण पुरावा इंग्लंडमध्ये सापडलेल्या सूक्ष्म कणांवरून मिळाला आहे. पूर्व इंग्लंडमधील सफ्फोक येथील ४,००,००० वर्षांहून अधिक जुन्या एका पुरातत्त्व स्थळी सापडलेल्या 'पायराईट' खनिजाच्या लहान कणांनी नियंत्रित पद्धतीने आग निर्माण करण्याच्या पुराव्याची कालमर्यादा खूप मागे ढकलली आहे. यावरून मुख्य मानवी मेंदूचा विकास पूर्वीच्या अंदाजापेक्षा खूप लवकर सुरू झाला होता, असे दिसून येते.

'आपण अशी प्रजाती आहोत, ज्यांनी आपल्या सभोवतालच्या जगाला आकार देण्यासाठी आगीचा वापर केला,' असे या अभ्यासाचे सहलेखक आणि ब्रिटिश म्युझियममधील पॅलेओलिथिक पुरातत्त्वशास्त्रज्ञ रॉब डेव्हिस यांनी एका पत्रकार परिषदेत सांगितले. डेव्हिस यांच्या मते, 'आग निर्माण करण्याची क्षमता मानवी उत्क्रांतीमध्ये अत्यंत महत्त्वाची ठरली असेल.' कारण, यामुळे मोठे मेंदू विकसित होणे, मोठे सामाजिक गट टिकवून ठेवणे आणि भाषिक कौशल्ये वाढवणे यासारख्या उत्क्रांतीच्या प्रवृत्तींना चालना मिळाली.

२०१३ पासून डेव्हिस आणि त्यांचे सहकारी बार्नहॅम नावाच्या इंग्लंडमधील पुरातत्त्व स्थळाचे उत्खनन करत आहेत, जिथे ४००,००० वर्षांपूर्वीची दगडी हत्यारे, जळालेला गाळ आणि कोळसा सापडले आहेत. बुधवारी (१० डिसेंबर) नेचर जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासात, संशोधकांनी उघड केले की, या स्थळावर आग लावल्याचा जगातील सर्वात जुना आणि थेट पुरावा आहे आणि ही आग निर्माण करण्याची कला कदाचित निएंडरथल्सनी विकसित केली असावी. उत्खननादरम्यान पुरातत्त्वशास्त्रज्ञांना या जागेच्या एका कोपऱ्यात उष्णतेमुळे तुटलेल्या हातातील कुऱ्हाडींचा साठा आणि लालसर झालेली माती आढळली.

वैज्ञानिक विश्लेषणांच्या मालिकेद्वारे, संशोधकांना आढळले की, या लालसर मातीवर वारंवार, एकाच ठिकाणी आग लावण्यात आली होती, ज्यामुळे हे ठिकाण प्राचीन चूल किंवा अग्निकुंड असू शकते, असे सूचित होते. 'लोह पायराईटच्या शोधामुळे हा एक मोठा टर्निंग पॉईंट आला,' असे अभ्यासाचे सहलेखक आणि ब्रिटिश म्युझियममधील पॅलेओलिथिक संग्रहाचे क्युरेटर निक ॲश्टन यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. पायराईट, ज्याला 'मूर्खांचे सोने' असेही म्हटले जाते, हे एक नैसर्गिकरीत्या आढळणारे खनिज आहे, जे फ्लिंट नावाच्या दगडावर घासल्यास ठिणगी निर्माण करते. पायराईट जगभरात अनेक ठिकाणी आढळत असले, तरी बार्नहॅम परिसरात ते अत्यंत दुर्मीळ आहे. याचा अर्थ असा की, एखाद्याने खास करून आग लावण्याच्या उद्देशाने पायराईट या स्थळी आणले होते, असा निष्कर्ष संशोधकांनी अभ्यासात काढला आहे.

## डेटा सेंटर्समध्ये भारताचा दबदबा

भारतात डिजिटायझेशन आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) चा वेग आता थांबणार नाहीये. संसदेत सरकारने दिलेल्या माहितीनुसार, देशातील क्लाऊड डेटा सेंटरची क्षमता २०३० पर्यंत सध्याच्या पातळीपेक्षा ४ ते ५ पट वाढण्याचा अंदाज आहे.

केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान राज्यमंत्री जितिन प्रसाद यांनी राज्यसभेत सांगितले की, बँकिंग, वीज आणि सार्वजनिक पायाभूत सुविधांसारख्या महत्त्वपूर्ण क्षेत्रांमध्ये डेटाची मागणी



झपाट्याने वाढत आहे. सध्या भारताची क्लाउड डेटा सेंटर क्षमता सुमारे १,२८० मेगावॅटपर्यंत पोहोचली आहे. सरकारी आणि खासगी दोन्ही क्षेत्रांमध्ये एआय आणि क्लाऊड सेवांचा स्वीकार वेगाने होत आहे, हे या विस्ताराचे मुख्य कारण आहे. जगातील दिग्गज तंत्रज्ञान कंपन्या भारताच्या डेटा इकोसिस्टममध्ये मोठी गुंतवणूक करत आहेत: गूगल: विशाखापट्टणम येथे १५ अब्ज डॉलरचा (अंदाजे १.२५ लाख कोटी रुपये) 'एआय हब' बनवण्याची घोषणा केली आहे, जो कंपनीचा भारतातील सर्वात मोठा प्रकल्प आहे.

अमेझॉन वेब सर्व्हिसेस : अमेझॉन महाराष्ट्रात ८.३ अब्ज डॉलरच्या (अंदाजे ६९ हजार कोटी रुपये) गुंतवणुकीतून डेटा सेंटर स्थापित करत आहे. सरकार आपल्या डिजिटल गरजा पूर्ण करण्यासाठी 'डिजिटल इंडिया' अंतर्गत एक राष्ट्रीय क्लाऊड पायाभूत सुविधा तयार करत आहे. सरकारने 'जीआय क्लाऊड' स्थापित केले आहे, जे 'मेघराज' या नावाने ओळखले जाते. हे ई-गव्हर्नन्स सेवांच्या वितरणासाठी सुरक्षित आणि स्केलेबल सुविधा प्रदान करते. आतापर्यंत २,१७० मंत्रालये आणि विभागांनी त्यांचे क्लाऊड-आधारित ॲप्लिकेशन्स 'मेघराज'वर होस्ट केले आहेत. नॅशनल इन्फॉर्मेटिक्स सेंटर सरकारी विभागांना क्लाऊड सेवा पुरवते. मंत्री जितिन प्रसाद यांनी आश्वासन दिले की, सरकारी डेटाला संभाव्य धोक्यांपासून वाचवण्यासाठी 'लेयर्ड सिक्युरिटी फ्रेमवर्क' चा वापर केला जात आहे, जेणेकरून देशाचा डेटा पूर्णपणे सुरक्षित राहील.

**सहसा विज्ञान, तंत्रज्ञान, संशोधन अशा गोष्टींमध्ये रमणाऱ्या मस्क यांनी मुलाखतीदरम्यान (विश्वाचा) 'निर्माता' आणि ब्रह्मांडाच्या उत्पत्तीसंदर्भात आपली मतं मांडली, एक वेगळा दृष्टिकोन ठेवला. देवावर तुमचा विश्वास आहे का, असा प्रश्न विचारला असता मस्क यांनी एकदमच अनपेक्षित उत्तर दिलं. 'माझ्या मते हे संपूर्ण ब्रह्मांड कोणा एका गोष्टीतून (सत्तेतून) तयार झालं आहे आणि लोक याच्यासाठी विविध नावांचा वापर करतात.**

## परमेश्वरच विश्वाचा निर्माता : मस्क

जगातील सर्वात प्राचीन पारमार्थिक ग्रंथ असलेल्या ऋग्वेदामध्ये परमेश्वराबाबत अतिशय सुंदर वाक्य आहे. 'एकं सत विप्रा बहुधा वदन्ति' असे त्यामध्ये म्हटले आहे. त्याचा अर्थ एकच परमसत्य किंवा परमेश्वर आहे, ज्याला ज्ञानी लोक वेगवेगळ्या नावांनी ओळखतात. आता असेच काहीसे उत्तर टेस्ला, एक्स, स्टारलिंक आणि स्पेसएक्ससारख्या बड्या कंपन्यांचे सर्वेसर्वा असलेल्या एलन मस्क यांनी दिले आहे. नुकतेच एका मुलाखतीदरम्यान मस्क यांना 'तुम्ही देवावर विश्वास ठेवता का?' असा प्रश्न विचारण्यात आला. ज्याचं मस्क यांनी दिलेलं हे उत्तर अनेकांनाच आश्चर्याचा धक्का देऊन गेलं.



सहसा विज्ञान, तंत्रज्ञान, संशोधन अशा गोष्टींमध्ये रमणाऱ्या मस्क यांनी मुलाखतीदरम्यान (विश्वाचा) 'निर्माता' आणि ब्रह्मांडाच्या उत्पत्तीसंदर्भात आपली मतं मांडली, एक वेगळा दृष्टिकोन ठेवला. देवावर तुमचा विश्वास आहे का, असा प्रश्न विचारला असता मस्क यांनी एकदमच अनपेक्षित उत्तर दिलं. 'माझ्या मते हे संपूर्ण ब्रह्मांड कोणा एका गोष्टीतून (सत्तेतून) तयार झालं आहे आणि लोक याच्यासाठी विविध नावांचा वापर करतात', असं ते म्हणाले. 'तुमचा सर्वाधिक विश्वास कोणावर आहे, तुम्ही कोणाला मानता?', असा प्रश्न केला असता (सृष्टीच्या) 'निर्मात्याला' असं उत्तर त्यांनी दिलं. 'देवाविषयी तुमचं मत काय?' असा प्रश्न केला असता, 'परमेश्वरच निर्माता आहे', असं उत्तर देत मस्क यांनी सर्वांच्या नजरा वळवल्या. मुलाखतपर संवादादरम्यान मस्क यांनी अमेरिकी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यावरती मतप्रदर्शन केलं.

'तुम्ही कोणा अशा व्यक्तीला ओळखता, जो सर्वाधिक विनोदी व्यक्ती आहे आणि ज्यांचा तुम्ही आदर करता?', असा प्रश्न केला असता मस्क म्हणाले, 'प्रत्यक्ष जीवनात अमेरिकी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प प्रचंड विनोदी व्यक्ती आहेत. त्यांची विनोदबुद्धी नैसर्गिक आहे. त्यांचा स्वभावच विनोदी आहे.' चौफेर चर्चा करणाऱ्या मस्क यांनी या कार्यक्रमात स्पेसएक्स कंपनीच्या मंगळ मोहिमेवरही भाष्य केलं. या मोहिमेत फक्त मंगळावर जाणं हा एकमेव हेतू नसून, शाश्वत 'मल्टी प्लॅनेटरी' तयार करणं हा मुख्य हेतू आहे असं त्यांनी स्पष्ट केलं. सोप्या भाषेत म्हणावं तर एका ग्रहावर आपत्ती आल्यास दुसरा ग्रह तुमचा बचाव करू शकतो. दरम्यान स्टारशिपच्या या मोहिमेत कोणत्याच प्रकारच्या कृत्रिम बुद्धिमता अर्थात एआयचा वापर करण्यात आलेला नाही असंही मस्क यांनी स्पष्ट केलं.

# ‘इन्फोसिस’ स्प्रिंगबोर्डच्या मोबाईल सायन्स लॅबचे अहिल्यानगर शहरात उद्घाटन

## घरोघरी विद्यार्थ्यांना मिळणार एआय, कोडिंग आणि विज्ञान प्रयोगांचे आधुनिक शिक्षण

नगर – विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक दृष्टीकोनाला चालना देण्यासाठी आणि विद्यार्थ्यांच्या भविष्यास नवी दिशा देणारा ‘इन्फोसिस स्प्रिंगबोर्ड बंगळूर’ व अत्याधुनिक ‘मोबाईल सायन्स लॅब’ या महत्त्वाकांक्षी उपक्रमाचा कल्याण रोड येथील सांस्कृतिक भवन येथे शुभारंभ करण्यात आला. मिशन आपुलकी आणि जागतिक कीर्तीची आयटी कंपनी इन्फोसिस यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच नगरसेवक दत्ता गाडळकर यांच्या पुढाकाराने हा उपक्रम शहरात राबविण्यात आला. हा शालेय विद्यार्थ्यांसाठी आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञानाचे दालन खुलं करणारा ठरत आहे.





विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक दृष्टीकोनाला चालना देण्यासाठी आणि विद्यार्थ्यांच्या भविष्यास नवी दिशा देणारा ‘इन्फोसिस स्प्रिंगबोर्ड बंगळूर’ व अत्याधुनिक ‘मोबाईल सायन्स लॅब’ या महत्त्वाकांक्षी उपक्रमाचा कल्याण रोड येथील सांस्कृतिक भवन येथे शुभारंभ करण्यात आला.

सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांनाही जागतिक दर्जाचे विज्ञान शिक्षण, कोडिंग, आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI), सायबर सिक्युरिटी आणि डिजिटल तंत्रज्ञानाचे ज्ञान मिळावे, या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची आवड निर्माण होणार असून त्यांच्या करिअरच्या नव्या संधी खुल्या होणार आहेत. या उपक्रमाचे उद्घाटन माजी प्राचार्य खासेराव शितोळे यांच्या हस्ते झाले.

मिशन आपुलकीचे नोडल अधिकारी तथा सहायक संचालक (लोकल फंड) रमेश कासार म्हणाले की, इन्फोसिस स्प्रिंगबोर्ड हा डिजिटल प्लॅटफॉर्म शहरी आणि ग्रामीण भागातील शैक्षणिक दरी मिटवण्यासाठी मैलाचा दगड ठरणार आहे. इयत्ता सहावी ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी कोडिंग, सायबर सिक्युरिटी, एआय आणि विविध कौशल्य विकासाचे पाच हजारांहून अधिक कोर्सेस पूर्णपणे मोफत उपलब्ध करून देण्यात आले आहेत. संपूर्ण भारतात इन्फोसिसचे ६ अत्याधुनिक ‘मोबाईल सायन्स लॅब’ असून, त्यातील एक लॅब आपल्या जिल्ह्यासाठी उपलब्ध झाली आहे. कल्याण रोडवरून सुरू झालेली ही मोबाईल सायन्स लॅब म्हणजे विज्ञानाचे चालते–फिरते विद्यापीठच असल्याचे त्यांनी सांगितले.

खासेराव शितोळे म्हणाले की, पुस्तकी ज्ञानापेक्षा प्रत्यक्ष प्रयोगातून विद्यार्थी अधिक प्रभावीपणे शिकतात. ही मोबाईल लॅब प्रत्येक केंद्रशाळेवर जाऊन विज्ञानाचे ३०० हून अधिक प्रयोग विद्यार्थ्यांना करून दाखवेल. विज्ञान विषयातील कठीण संकल्पना सोप्या पद्धतीने समजावून सांगितल्या जाणार आहेत. शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी या सुवर्णसंधीचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

प्रा. भगवान काटे म्हणाले की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड बुद्धिमत्ता आहे, मात्र त्यांना आधुनिक साधनांची कमतरता भासत असते. जिल्हा प्रशासनाच्या पुढाकारामुळे आणि इन्फोसिसच्या सहकार्यामुळे आता ग्रामीण भागातील गरिबातील गरीब विद्यार्थ्यालाही जागतिक दर्जाचे तंत्रज्ञान शिक्षण मोफत मिळणार आहे. हा उपक्रम नगर जिल्ह्यासाठी भूषणावह ठरणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

नगरसेवक दत्ता गाडळकर म्हणाले की, विज्ञान विषयाची भीती दूर करण्यासाठी प्रात्यक्षिक शिक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे. या फिरत्या प्रयोगशाळेमुळे विशेषतः ग्रामीण भागातील मुलींमध्ये विज्ञानाची आवड निर्माण होईल आणि त्यांच्या कल्पनाशक्तीला नवे आकाश मिळेल. आधुनिक युगातील आव्हाने पेलण्यासाठी ग्रामीण विद्यार्थिनी आता तांत्रिकदृष्ट्या सक्षम होतील. शिक्षण व्यवस्थेत आधुनिक तंत्रज्ञानाची नवी क्रांती घडवून आणणारा हा उपक्रम भविष्यात हजारो विद्यार्थ्यांच्या आयुष्याला नवी दिशा देणारा ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

प्रत्येक तालुक्यात ही मोबाईल लॅब पोहोचवण्याचे नियोजन करण्यात आले आहे. ‘मोबाईल सायन्स लॅब’ ही अत्याधुनिक विज्ञान उपकरणांनी सज्ज अशी फिरती प्रयोगशाळा असून त्यामध्ये टेलिस्कोप, मायक्रोस्कोप, रासायनिक प्रयोगांची साधने तसेच विविध विज्ञान किट्स उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रयोग करून विज्ञान समजावून सांगण्यासाठी प्रशिक्षित तज्ज्ञ शिक्षक मार्गदर्शन करणार आहेत. तसेच ‘इन्फोसिस स्प्रिंगबोर्ड’ या डिजिटल प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना भविष्यातील रोजगाराभिमुख कौशल्यांचे मोफत सर्टिफिकेट कोर्सेस उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना डिजिटल जगात स्पर्धात्मक संधी निर्माण होणार आहेत.

या सोहळ्याला विजय कराळे, अभय शेंडगे, भगवानराव काटे, विजय गाडळकर, पारुनाथ ढोकळे, साळवे सर, गांगुर्डे सर, आदित्य आगरकर, केदार खाडे, मच्छिंद्र पाटील, सुप्रिया कोतकर, मीनाक्षी तोडकर, सुप्रिया कोतकर, अश्विनी खताडे, झरेकर, नीता ढगे, अंजली शेळके, बाबासाहेब लोंढे, सुदाम डमाळ, म्हस्के सर यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी व परिसरातील नागरिक उपस्थित होते.

# अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना पहिलीमध्ये नामांकित इंग्रजी माध्यम निवासी शाळांमध्ये प्रवेशासाठी २९ मेपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

नगर – अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना नामांकित इंग्रजी माध्यम निवासी शाळांमध्ये शिक्षण देण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनेअंतर्गत सन २०२६–२७ या शैक्षणिक वर्षासाठी इयत्ता पहिलीच्या प्रवेश प्रक्रियेस सुरुवात झाली आहे. पात्र विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी २९ मे पर्यंत ऑफलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याचे आवाहन प्रकल्प अधिकारी मनोजकुमार पैठणकर यांनी केले आहे.

योजनेच्या लाभासाठी विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असणे आवश्यक असून, पालकांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न कमाल १ लाख रुपये असावे. प्रवेशासाठी विद्यार्थ्याचे वय ३१ डिसेंबर २०२६ रोजी ६ वर्षे पूर्ण असणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्याचा जन्म १ जुलै २०१९ ते ३१ डिसेंबर २०२० या कालावधीत झालेला असावा.

विद्यार्थ्यांच्या निवड प्रक्रियेत विधवा, घटस्फोटित, निराधार किंवा परित्यक्ता महिला पालकांच्या पाल्यांना तसेच दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील विद्यार्थ्यांना प्राधान्य देण्यात येणार आहे. प्रवेशानंतर इयत्ता बारावीपर्यंत शाळा बदलून मिळणार नाही. शासनाकडून विद्यार्थी क्षमता मंजूर झाल्यानंतरच विद्यार्थ्यांची योजनेंतर्गत निवड केली जाईल.

अर्जासोबत विद्यार्थ्याचा जन्मदाखला, जातीचे प्रमाणपत्र, पालकांचा उत्पन्नाचा दाखला, विद्यार्थ्याचे आधार कार्ड, रहिवासी प्रमाणपत्र, वैद्यकीय प्रमाणपत्र, रेशन कार्ड, पासपोर्ट आकाराचे फोटो, पालक दारिद्र्यरेषेखालील असल्यास ग्रामसेवकाचा दाखला, महिला पालक विधवा, घटस्फोटित, निराधार, परित्यक्त्या असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र आदी कागदपत्रे आवश्यक आहेत. अपूर्ण अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

योजनेअंतर्गत प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकित प्रतींसह परिपूर्ण अर्ज एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, राजूर येथे मुदतीत दाखल करावेत. अधिक माहितीसाठी दूरध्वनी क्रमांक ०२४२४–२५१०३७ या क्रमांकावर संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.



गणेश शिंदे यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनात ‘चैतन्य’ स्नेहमेळावा उत्साहात साजरा झाला.

# चैतन्य–‘स्नेहमेळावा आपल्या माणसांचा’ हा संस्मरणीय सोहळा उत्साहात

श्रीगोंदा – वृध्देश्वर अर्बन मल्टीस्टेट को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि. व चैतन्य उद्योग समूह यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित चैतन्य – स्नेहमेळावा आपल्या माणसांचा हा संस्मरणीय सोहळा २ मे रोजी विंटेज हिल्स रिसॉर्ट, हिवरेझरे (जि. अहिल्यानगर) येथे उत्साहात पार पडला. महाराष्ट्रातील विविध शाखांमधील पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी उपस्थित राहिले. विशेष म्हणजे कर्मचाऱ्यांचे कुटुंबीयही सहभागी झाले. कार्यक्रमाची सुरुवात स्वागत व अल्पोपहाराने झाली. त्यानंतर सन्मान सोहळा पार पडला. यावेळी वृद्धेश्वर आरोग्य आधार हेल्थ कार्ड चे अनावरण करण्यात आले.

या प्रसंगी महाराष्ट्रातील व्याख्याते गणेश शिंदे यांचे प्रेरणादायी व्याख्यान हा कार्यक्रमाचा मुख्य आकर्षण ठरला. त्यांच्या प्रभावी आणि ऊर्जादायी मार्गदर्शनातून कर्मचाऱ्यांना सकारात्मक दृष्टीकोन, आत्मविश्वास आणि कार्यक्षमता वाढविण्याची नवी दिशा मिळाली.

दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनानंतर संस्थेच्या चेअरमन सौ. सायली शुभम वाडगे यांनी प्रास्ताविकातून संस्थेच्या प्रगतीचा आढावा घेत भविष्याबद्दल दृढ विश्वास व्यक्त केला.

संस्थापक अध्यक्ष विठ्ठलराव वाडगे यांनी संस्थेच्या संघर्षमय प्रवासाचा भावनिक आढावा घेत, संस्था ही आपल्या आईप्रमाणे आहे – तिचे जतन करा आणि प्रामाणिकपणे कार्य करा, असे मनोगत व्यक्त करत कर्मचाऱ्यांना प्रेरित केले.

कार्यक्रमादरम्यान विविध कर्मचारी व पदाधिकाऱ्यांचा त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल गौरव करण्यात आला. गणेश शिंदे यांच्या हस्ते पारितोषिके, सन्मानचिन्हे व रोख रक्कम देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चेतन गायकवाड यांनी आपल्या खास शैलीत रंगतदार केले, तर कार्यक्रमाचे प्रभावी नियोजन व ब्रँडिंग ब्रॅण्डमेकर किरण गवते यांनी उत्कृष्टरीत्या सांभाळले.

दुपारच्या सत्रात स्नेहभोजनानंतर वार्षिक आढावा व रिकव्हरी अहवाल सादर करण्यात आला. टीम बिल्डिंग उपक्रमांमुळे कर्मचाऱ्यांमध्ये एकात्मता, संवाद आणि उत्साह अधिक दृढ झाला. SWOT फीडबॅक सत्रात मुख्य कार्यकारी अधिकारी सौ. मेघना गावडे यांनी संस्थेच्या बळकटी व सुधारणा क्षेत्रांवर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या शेवटी अनिल गावडे यांनी आभार प्रदर्शन केले. सायंकाळी आदेश जाधव व सौ. रेणुका पवार यांच्या सुमधुर संगीत संध्येमुळे कार्यक्रमाची सांगता अत्यंत रंगतदार वातावरणात झाली. या स्नेहमेळाव्यामुळे कर्मचारी व पदाधिकाऱ्यांमध्ये एकोपा, आपुलकी आणि प्रेरणेची नवी ऊर्जा निर्माण झाली असून, भविष्यात अधिक जोमाने कार्य करण्याचा दृढ संकल्प उपस्थितांनी व्यक्त केला.

# आनंद बाल संस्कार शिबीरास प्रतिसाद

नगर – श्री तिलोक रत्न धार्मिक परीक्षा बोर्डच्या वतीने आदर्शऋषिजी महाराजसाहेबांच्या मार्गदर्शनाने दरवर्षी आनंद बाल संस्कार शिबीराचे आयोजन केले जाते. या वर्षीही १ ते ६ मे हे शिबीर आयोजित करण्यात आले होते. सकाळचे ७ वाजले कि १० मिनीटात सगळ्या रस्त्यांनी मुलांचे घोळके आनंदधामकडे धावू लागायचे. खूपच सुंदर असे वातावरण तयार व्हायचे. मुलांनी खूप ज्ञानी होण्यापेक्षाही असलेले ज्ञान आचरणात आणावे व त्यांचा व्यक्तीमत्व विकास व्हावा या दृष्टीने शिबीराच्या अध्ययनाची आखणी करण्यात येते. दोन महिन्यांपासून शिबीराची तयारी चालू होते. यासाठी साध्वी वृंद, आनंद संस्कार शिक्षा अभियानाच्या शिक्षिका व ब्राम्ही युवती मंच यांचा विशेष सहभाग असतो.



श्री तिलोक रत्न धार्मिक परीक्षा बोर्डच्या वतीने आदर्शऋषिजी महाराजसाहेबांच्या मार्गदर्शनाखाली होत असलेल्या आनंद बाल संस्कार शिबीरामध्ये सहभागी झालेले विद्यार्थी.

शिबीराची वैशिष्ट्ये मुलांना धर्म व विज्ञानाची सांगड घालून जीवनाचे धडे शिकवले जातात. सकाळी प्रार्थनेने शिबीराची सुरूवात होते. त्यांना फिटनेस क्लास तज्ञ प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली घेतला जातो. मेडिटेशन द्वारे मुलांना रिलॅक्स करून धार्मिक अध्ययनाला सुरूवात होते. सर्व मुले सामूहिकरित्या सामायिक करून जैन धर्माची सूत्रे आत्मसात करतात.

या विशेष वर्गात त्यांना जीवनाची नीती मुल्ये साध्या सोप्या भाषेत दैनंदिन जीवनातील उदाहरणांमधून शिकवली गेली. ज्यात मंत्र, आचरण, भावना, जैन धर्माचा इतिहास, मैत्री अशी जीवनावश्यक सुत्रे शिकवली गेली. जर मुलांनी चांगले विचार ठेवले तर त्यांचे वर्तन निश्चितच चांगले होते ही गोष्ट अनेक कथांमधुन मुलांच्या मनात बिंबवली गेली.

मुलांनी ६ दिवस आवडीच्या नाश्त्याचा आस्वाद घेतला. दर रोज शिविराच्या शेवटी विविध खाऊ दिला गेला. शेवटचा १ तास मूलांच्या बौध्दिक विकासासाठी स्क्रीनवर काही आदर्श व्यक्तिमत्त्वाची माहिती दाखवली तसेच माईड डेव्हलपमेंट एक्सरसाईज चे नवनवीन प्रयोग घेतले गेले. सोबत स्तोत्र पठन प्रार्थना, सुंदर गीते ही मुलांना शिकवली गेली. शेवटच्या दिवशी एक छोटीशी परीक्षा घेतली गेली. अनेक मुलांनी आपले विशेष प्राविण्य यात दाखवले. नगरसह बाहेरील गावातून मामा आत्या मावशीकडे आलेली बालमंडळीही शिबीरात सहभागी झाली होती. काही मुलांनी शिबीराबद्दल आपले मत व्यक्त करतांना संगितले कि आम्हाला हे शिबीर खुपच आवडले हसत खेळत खुप काही शिकायला मिळाले. मुलांवर शिकवलेल्या गोष्टींचा परीणाम दिसला, अनेक मुलांनी अन्न वाया न घालवणे, रात्रि भोजन न करणे, जंक फुड कमी करून नियमित प्रार्थना करण्याचा मानस बोलून दाखवला.

आनंद संस्कार शिक्षा अभियानातील मुलांनी ताली नृत्य, व भगवान महावीरांच्या शिकवणुकीचे महत्व पटवून देणारे पथनाट्यसादर केले.

सर्व मुलाना शिविराच्या समारोप प्रसंगी भेटवस्तू व ड्रायफ्रूट्स देण्यात आले.



वर्धमान महावीर कॉलेज ऑफ नर्सिंग येथे थॅलेसेमिया जनजागृती कार्यक्रम झाला.

# ‘वर्धमान महावीर नर्सिंग’मध्ये ‘थॅलेसेमिया जनजागृती’ कार्यक्रम

नगर – वर्धमान महावीर कॉलेज ऑफ नर्सिंग यांनी आनंदऋषीजी हॉस्पिटल ॲण्ड मेडिकल रिसर्च सेंटर यांच्या सहकार्याने थॅलेसेमिया मुक्त भविष्यासाठी एक पाऊल या थीम अंतर्गत थॅलेसेमिया जनजागृती कार्यक्रम यशस्वीरीत्या आयोजित केला. हा कार्यक्रम आनंदऋषीजी हॉस्पिटल ॲण्ड मेडिकल रिसर्च सेंटरचे प्रशासकीय अधिकारी डॉ. आशिष भंडारी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.

या जनजागृती सत्रात सिव्हिल हॉस्पिटलचे थॅलेसेमिया समन्वयक डॉ. हरिश पांढरे तसेच डॉ. आशिष हारमळ यांनी थॅलेसेमियाची कारणे, प्रतिबंध, लवकर निदान व व्यवस्थापन याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

विशेषतः विवाहपूर्व थॅलेसेमिया तपासणीचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. थॅलेसेमिया हा आनुवंशिक आजार असल्यामुळे दोन्ही होणाऱ्या पती–पत्नींनी विवाहपूर्व रक्ततपासणी करणे अत्यंत आवश्यक आहे. योग्य वेळी तपासणी केल्यास आजाराचा प्रसार रोखता येतो व भविष्यातील पिढीला या आजारापासून संरक्षण मिळू शकते, असे त्यांनी सांगितले.

आजची तपासणी, उद्याची सुरक्षित पिढी! असा संदेश यावेळी देण्यात आला. या कार्यक्रमात वर्धमान महावीर कॉलेज ऑफ नर्सिंग तसेच आनंदऋषीजी नर्सिंग इन्स्टिट्यूटचे विद्यार्थी सहभागी झाले. जैन सोशल फेडरेशनच्या सहकार्याने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमाचे आयोजन उपप्राचार्य डॉ. विद्या ठोकळ तसेच इतर प्राध्यापक व कर्मचारी यांच्या सहकार्याने यशस्वीरीत्या करण्यात आले.

हा कार्यक्रम माहितीपूर्ण व उपयुक्त ठरला असून विद्यार्थ्यांमध्ये थॅलेसेमियाबाबत जागरूकता वाढविण्यास मदत झाली.



## पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन यांचा सत्कार

महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राहुल अर्जुनराव दुबाले यांच्या हस्ते अहिल्यानगर जिल्हा पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संघटनेचे महिला जिल्हाध्यक्ष आशाताई पालवे, आरिफ शेख, कविता नकवाल, नासिर सय्यद, शहेबाज सय्यद व सादिक बिल्डर.

# आरुष अष्टेकर नगर जिल्ह्यात प्रथम

नगर – आय.सी. एस.ई (ICSE Board) १० वीच्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून या परीक्षेत अहिल्यानगरमधील कर्नल परब स्कूल, सोलापूर रोड येथील स्कूलचा विद्यार्थी कु. आरुष सागर अष्टेकर हा ९६% गुण मिळवून नगर जिल्ह्यात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला. आरुष हा नगरमधील सायंतारा हॉटेलचे व्यावसायिक श्रीकांत बजरंग अष्टेकर यांचा नातू आहे.



## नगरमध्ये ११ मे रोजी शिकाऊ भरती मेळावा

नगर – राष्ट्रीय शिकाऊ मेळाव्याअंतर्गत कै. माणिकराव नरसिंगराव पाटील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, बुरूडगाव रोड, अहिल्यानगर येथे ११ मे रोजी सकाळी १०.३० ते सायंकाळी ५ या वेळेत शिकाऊ उमेदवारी भरती मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. शिकाऊ उमेदवारी मिळवू इच्छिणाऱ्या उमेदवारांनी या मेळाव्यास उपस्थित राहण्याचे आवाहन प्राचार्य के. ए. जहागीरदार यांनी केले आहे.

मेळाव्याच्या ठिकाणी उमेदवारांनी उपलब्ध करून देण्यात आलेल्या लिंक अथवा क्यू आर कोडद्वारे नोंदणी करावी. तसेच दहावी व आयटीआय उत्तीर्ण झाल्याची गुणपत्रके, शाळा सोडल्याचा दाखला, आधारकार्ड आदी मूळ कागदपत्रे व त्यांच्या छायांकित प्रतींसह मेळाव्यास उपस्थित राहावे, असेही कळविण्यात आले आहे.

# ज्ञानेश्वरी पालखी दिंडी सोहळ्यासाठी तयारीला वेग

## १२ जून रोजी अहिल्यानगरमध्ये स्वागत; हजारो वारकऱ्यांच्या उपस्थितीत रिंगण सोहळा रंगणार; आमदार संग्राम जगताप व ह.भ.प. रामभाऊ महाराज राऊत यांच्यात नियोजन बैठक

नगर – आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राच्या आध्यात्मिक परंपरेचा अविभाज्य भाग असलेल्या ज्ञानेश्वरी पालखी दिंडी सोहळ्याच्या तयारीला आता वेग आला आहे. श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान, नेवासा यांच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या या दिंडी सोहळ्याचे १२ जून रोजी अहिल्यानगर शहरात आगमन होणार आहे. या पार्श्वभूमीवर आमदार संग्राम जगताप आणि ह.भ.प. रामभाऊ महाराज राऊत यांच्या उपस्थितीत नियोजनाची बैठक पार पडली. या बैठकीत पालखी सोहळ्याच्या स्वागताची रूपरेषा, मिरवणुकीचा मार्ग, वारकऱ्यांच्या सोयी–सुविधा, वाहतूक व्यवस्थापन तसेच रिंगण सोहळ्याचे नियोजन यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. शहरात येणाऱ्या हजारो वारकऱ्यांच्या सोयीसाठी प्रशासन व आयोजकांनी समन्वयाने काम करण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला.



ज्ञानेश्वर पालखी दिंडी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर आमदार संग्राम जगताप आणि ह.भ.प. रामभाऊ महाराज राऊत यांच्या उपस्थितीत नियोजनाची बैठक पार पडली. (छाया – लहू दळवी)

आमदार संग्राम जगताप यांनी सांगितले की, आषाढी एकादशी हा महाराष्ट्राच्या संस्कृतीचा आत्मा आहे. विठ्ठल–रुक्मिणीच्या दर्शनासाठी वारकरी भाविक पायी दिंडी सोहळ्याने पंढरपूरकडे प्रस्थान करतात. त्यामध्ये अहिल्यानगर शहराला विशेष स्थान आहे. १२ जून रोजी ज्ञानेश्वरी पालखीचे शहरात आगमन होत असून, त्याचे स्वागत उत्साहात केले जाणार आहे.

बैठकीदरम्यान ह.भ.प. रामभाऊ महाराज राऊत यांनी सोहळ्याची माहिती देताना सांगितले की, मागील वर्षापासून श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान, नेवासा यांच्या वतीने ज्ञानेश्वरी पालखी दिंडी सोहळा स्वरूपात आयोजित केला जात आहे. यावर्षी नेवासा, गंगापूर, श्रीरामपूर, राहुरी आणि शेवगाव परिसरातील सुमारे ३५ दिंड्या एकत्र येणार असून, दहा ते पंधरा हजार वारकरी या सोहळ्यात सहभागी होणार आहेत. १२ जून रोजी हा पायी दिंडी सोहळा अहिल्यानगर शहरात दाखल होईल आणि धार्मिक उत्सव साजरा केला जाईल.

या दिंडी सोहळ्याचे नेतृत्व ह.भ.प. राम महाराज आखेगावकर, ह.भ.प. नंदकिशोर महाराज खरात, ह.भ.प. उद्धव महाराज मंडलिक आणि ह.भ.प. देविदास महाराज म्हस्के हे करणार असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

या नियोजन बैठकीत ह.भ.प. रामभाऊ महाराज राऊत यांचा आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी विश्वस्त कैलास जाधव यांच्यासह वारकरी मंडळाचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

